बुधवार, १४ जून २०२३
⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२७२
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● WEDNESDAY 14 JUNE 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-272 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

## सांज ये गोकुळी, सावळी सावळी...



पावसाळ्याची चाहूल लागलेली असताना आभाळ आणि उन्हाची लपाछपी खेळणारी ही सावळी सांज कॅमेऱ्यात टिपली आहे बार्शीचे छायाचित्रकार राज सुलाखे यांनी.

## शेतकऱ्यांसाठी १५०० कोटी

### ग्रामसेवकांच्या वेतनात दहा हजार रुपयांची वाढ : मंत्रिमंडळाचा निर्णय

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : शिंदे-फडणवीस सरकारची मंत्रिमंडळ बैठक मंगळवारी पार पडली. या बैठकीत मोठे निर्णय घेण्यात आले आहेत. कंत्राटी ग्रामसेवकांचे मानधन वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याचबरोबर सततच्या पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना सुधारित दराने मदत देण्याचा निर्णयही बैठकीत घेण्यात आला.**

अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी निर्वाह भत्त्यात केंद्राप्रमाणे सुधारणा. पाचवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांना अधिक प्रोत्साहन देण्यासाठी शिष्यवृत्तीमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच. लातूर येथे पशुरोग निदान प्रयोगशाळा स्थापन करण्याचाही निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेतला आहे.

- पुणे येथे ४ अतिरिक्त कौटुंबिक न्यायालये स्थापन करणार .
- अतिरिक्त न्यायालये व जलदगती न्यायालयांना दोन वर्षे मुदतवाढ .
- मानसिक आजारमुक्त व्यक्तींकरिता पुनर्वसन गृहे योजना .
- स्वातंत्र्य सैनिकांना घरांसाठी जमीन देण्यासाठी कौटुंबिक मासिक उत्पन्न मर्यादेत वाढ .
- चिमूर आणि शिर्डी येथे अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय स्थापन करणार .

- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वारकऱ्यांसाठी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे . आषाढी एकादशी जवळ आली आहे . सर्व मानाच्या पालख्या आता पंढरपूरच्या दिशेला प्रस्थान करत आहेत . टाळ, मृदूंग आणि अभंगाच्या गजरात पायी दिंड्या निघाल्या आहेत . अतिशय भक्तिमय असे वातावरण आहे . मानाच्या पालख्या जिथून पुढे चालत जात आहेत तिथे अतिशय भक्तिमय आणि अद्भूत असे वातावरण आहे . डोळ्यांमध्ये साठवून घ्यावे असे क्षण आहेत . हजारो भाविक हे विविध वाहनांच्या माध्यमातून राज्यभरातून पंढरपुरात जातात .
- भाविकांच्या सेवेसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सरकारने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे . पंढरपुरला जाणाऱ्या मानाच्या पालख्या, भाविक आणि वारकऱ्यांसाठी एक खुशखबर आहे . आषाढी एकादशीनिमित्त वारकऱ्यांच्या गाड्यांना सार्वजनिक बांधकाम विभागाकडून टोलमाफीचा निर्णय घेण्यात आला आहे .गाडी क्रमांक, चालकाचे नाव असा मजकूर नमूद करून आवश्यक त्या संख्येनुसार स्टिकर्स पुरवा, असा आदेश सरकारने परिवहन विभागाला दिला आहे . वाहतूक पोलीस आणि संबंधीत आरटीओ यांच्याशी समन्वय साधून पोलीस ठाणे आणि वाहतूक पोलीस चौक्यांमधून स्टिकर्स मिळणार आहेत .

## अमेरिका मोदींना देणार २१ तोफांची सलामी

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी २१ ते २४ जूनपर्यंत अमेरिका दौऱ्यावर जात आहेत. पंतप्रधानांचा हा दौरा विशेष राहणार आहे. व्हाईट हाऊसमध्ये पंतप्रधान मोदी यांना २१ तोफांची सलामी देण्यात येणार आहे. याशिवाय राष्ट्रपती जो. बायडेन आणि फर्स्ट लेडी मिसेस बायडेन यांच्याकडून पंतप्रधान मोदी यांचा विशेष सन्मान केला जाणार आहे. शिवाय राजकीय जेवणाचं आयोजनही करण्यात आले. पंतप्रधान मोदी यावेळी अमेरिका काँग्रेसला संबोधित करणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी २०१४ पासून आतापर्यंत सात वेळा अमेरिकेला गेले आहेत. यावेळचा अमेरिकेचा दौरा खास आहे. कारण अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनी त्यांना आमंत्रित केले. यापूर्वी द्विपक्षीय संबंध मजबूत करण्यासाठी पंतप्रधान मोदी अमेरिकेला गेले होते किंवा शिखर संमेलनात सहभागी होण्यासाठी गेले होते. राजकीय दौरे कसे होतात आणि या दौरा कसा वेगळा आहे. देशाच्या प्रमुखांना आपल्या देशात येण्यासाठी राजकीय आमंत्रण दिले जाते त्याला राजकीय दौरा म्हणतात. पंतप्रधान मोदी यांना या दौऱ्यात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन आणि प्रथम महिला जील बायडेन यांनी आमंत्रण दिले. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष फारच कमी लोकांना स्वतः निमंत्रण देतात. पंतप्रधान मोदी २१ जूनला संध्याकाळी अमेरिकेला पोहचणार आहेत. विमानतळावर त्यांचे जंगी स्वागत होईल. २२ जूनला ते व्हाईट हाऊसला जातील. तिथं त्यांना २१ तोफांची सलामी दिली जाणार आहे. याशिवाय काही स्वागत समारंभ आयोजित करण्यात आले आहेत. पंतप्रधान मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो. बायडेन यांच्यात औपचारिक चर्चा होईल. दोन्ही देशाचे प्रमुख भेटवस्तूंचे आदानप्रदान करतील. पंतप्रधान मोदी यांना पहिल्यांदा राजकीय दौऱ्याचे निमंत्रण मिळाले.

## तेलंगणात अपंगांच्या निवृत्तीवेतनात वाढ

आधुनिक केसरी न्यूज

**मंचेरियाल :** शारीरिकदृष्टया विकलांग व्यक्तींना देण्यात येणाऱ्या निवृत्तिवेतनात दरमहा एक हजार रुपयांची वाढ करण्याची घोषणा तेलंगणचे मुख्यमंत्री चंद्रशेखर राव यांनी शुक्रवारी केली.शारीरिकदृष्टया अपंग व्यक्तींना या वाढीनंतर दरमहा ४,११६ रुपयांची रक्कम मिळेल, असे मंचेरियाल येथील जाहीर सभेत मुख्यमंत्र्यांनी टाळयांच्या कडकडाटात सांगितले. राज्यातील भारत राष्ट्र समितीचे सरकार लोकांच्या कल्याणासाठी काम करत असून, राज्यातील खाणकाम साठयांमध्ये सिंगारेनी कोळसा खाणकामाचा विस्तार करण्याचे आपले उद्दिष्ट असल्याचे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. सिंगारेनी कोळसा खाणीबद्दल बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, काँग्रेस व भाजप हे त्यांच्या हितसंबंधांसाठी खाणींचे आकुंचन करण्याचा प्रयत्न करत आहेत. काँग्रेसने कंपनीच्या भागभांडवलाचा ४९ टक्के भाग केंद्राला विकला आहे, तर खासगीकरणाचा विचार करत हे प्रमाण आणखी वाढवण्याच्या प्रयत्नात आहे. तेलंगणच्या निर्मितीनंतर कंपनी नफा मिळवत असून, या वर्षी तो २,१६४ कोटी रुपये आहे, असे राव यांनी सांगितले.


## ‘बिपरजॉय’ चक्रीवादळामुळे ६७ रेल्वे गाड्या रद्द

आधुनिक केसरी न्यूज



**नवी दिल्ली :** बिपरजॉय चक्रीवादळामुळे अरबी समद्र उधाणला आहे. चक्रीवादळ हे आता गुजरातच्या दिशेने सरकलं आहे. १५ जून रोजी बिपरजॉय हे चक्रीवादळ ताशी १२५ ते १३५ किमी वेगाने गुजरात आणि पाकिस्तानला धडकण्याचा अंदाज आहे. या वादळाच्या पार्श्वभूमीवर रेल्वे विभागाकडून ६७ रेल्वे गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. तसेच रेल्वे मंत्रालयाने वॉर रुमही स्थापन केली आहे. चक्रीवादळ पाकिस्तानच्या दिशेने सरकत असताना रेल्वे स्थानकांवर असणाऱ्या प्रवाशांना त्रास होऊ नये म्हणून या स्थानकांवर खाद्यपदार्थांचे स्टॉल्स हे पुरेशा साठ्यासह उघडे राहतील याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसंच प्रवाशांना रस्त्याने नेण्यासाठी राज्य सरकारच्या बसेसही तैनात करण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे रुग्णवाहिकांचीही व्यवस्था करण्यात आली आहे. गुजरातच्या सौराष्ट्र आणि कच्छ भागांना बिपरजॉय वादळाचा सर्वाधिक फटका बसण्याची शक्यता आहे. या भागात पश्चिम रेल्वेचे भावनगर, राजकोट आणि अहमदाबाद हे विभाग येतात. वेरावळ- जुनागढ विभाग, पोरबंदर-कनालूस विभाग, राजकोट-ओखा विभाग हे भाग सर्वात संवेदनशील आहेत. मुंबई किनारपट्टी भागात बुधवारीही वाऱ्याचा वेग हा ताशी ४० ते ५० किमी इतका राहण्याचा अंदाज आहे. चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर १४ आणि १५ जून रोजी कच्छ, द्वारका, पोरबंदर, जामनगर, जुनागड आणि मोरबी या जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस पडू शकतो असाही अंदाज वर्तवण्यात आला आहे. बिपरजॉय चक्रीवादळामुळे १५ आणि १६ जून रोजी कच्छ आणि गुजरातच्या काही भागात अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. मच्छीमारांना समुद्रात न जाण्याचा सल्ला देण्यात आला आहे. चक्रीवादळ गुजरातच्या दिशेने सरकले असून अरबी समुद्राला उधाण आल्याचं दिसत आहे. त्यामुळे गुजरातमधील कच्छ आणि सौराष्ट्राला चक्रीवादळाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

# उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

दिवस आणि रात्रीच्या सीमारेषेवरचा काळ म्हणजे संध्याकाळ. यावेळी निसर्गाचे रूप पालटते. एखाद्या हॉलमध्ये एखादे लँडस्केप किंवा सुंदर निसर्गदृश्य लावलेले असावे आणि काही वेळाने ते बदलून त्या जागी दुसरे लावावे, तशी ही संध्याकाळ वेगळे रूप घेऊन येते.

दिवसभराच्या श्रमाने थकलेले सूर्यदेव आता अस्ताला जाण्याच्या तयारीत असतात. पण त्यांचा सकाळचा तोच रुबाब, तेच सौंदर्य कायम असते. एक सुंदर संस्कृत सुभाषित आहे
उदये सविता रक्तो रक्तःश्चास्तमये तथा।
सम्पत्तौ च विपत्तौ च महतामेकरूपता॥
याचा अर्थ असा की सूर्यबिंब उगवताना जसे लाल रंगाचे असते, तसेच मावळतानाही. थोर पुरुषांचेही वागणे सर्व परिस्थितीत एकसारखे असते. श्रीकृष्णांनी गीतेत स्थितप्रज्ञाची लक्षणे सांगितली आहेत, तसेच त्यांचे वागणे असते. थोर पुरुष सुखात आणि दुःखातही विचलित होत नाहीत. मला कवीवर्य भा रा तांब्यांची ' मावळत्या दिनकरा ' ही कविता खूप आवडते. त्या कवितेत ते म्हणतात
असक्त परी तू केलीस वणवण दिलेस जीवन हे नारायण मनी न धरिले सानथोरपण
समदर्शी तू खरा ! हे सूर्यनारायणा, मनात कोणतीही अभिलाषा न बाळगता तू सर्वांना प्रकाश दिलास, जीवन दिलेस. तुझ्याजवळ लहानथोर, गरीब श्रीमंत असा कोणताही भेदभाव नाही. जेव्हा तुझ्या यशाची चढती कमान होती तेव्हाही तुला गर्व नव्हता आणि आता अस्ताला जातो आहेस पण तरीही प्रभाती जसा प्रसन्न होतास, तसाच भासतोस. नकळत तू आम्हाला खूप काही शिकवून जातोस. सकाळी पूर्वेला जसे रंग भरतोस, तशीच पश्चिमाही तुझ्या आगमनाने आरक्त होते रे ! मावळतीच्या आकाशात मेघांनी निरनिराळे रंग परिधान केलेले असतात. सकाळ आणि संध्याकाळ. एक उगवती आणि दुसरी मावळती. दोन्हीचं सौंदर्य वेगळं. संध्याकाळ म्हणजे मला मुक्त केशकलाप सोडलेली तरुणी वाटते. ' जेव्हा तुझ्या बटांना उधळी मुजोर वारा ' ही मंगेश पाडगावकरांची रचना मला आठवते. असा संध्येच्या बटांना मुजोर वारा उधळत येतो. त्याही रूपात ती मोठी रम्य भासते.




# आनंदी पहाट



## आनंदप्राप्ती हीच खरी मोठी यशप्राप्ती

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्या अंतर्मनाला, अंतरात्म्याला शांती मिळणे मानसिक स्वास्थ्यासाठी अत्यंत आवश्यक असते. आपल्या दैनंदिन गरजांची पूर्तता करण्याच्या धावपळीत आपण आपली मुलभूत गरजच विसरून जातो, त्याची जाणीवच आपल्याला होत नाही. आपल्या जीवनातील सार कशात आहे, हे आपण स्वतःच शोधून काढायचे असते. त्याच्यासाठी आपल्या अंतरात्म्याचा शोध घेण्याची, त्याला समजून घेण्याची, त्याचा यथायोग्य विचार करण्याची जरुरी असल्याची आपल्याला जाणीव असलीच पाहिजे. आपल्या मनात येत असलेल्या प्रत्येक विचाराचा परिणाम कमी अधिक प्रमाणांत आपल्या मानसिकतेवर

होत असतो. नकारात्मक विचारांचा विपरीत परिणाम होत असतो, तर सकारात्मक विचार यशप्राप्तीसाठी उपयुक्त ठरतात. आपल्या प्रत्येक कृतीपूर्वी विचार होण्याची जरुरी असते. आनंदप्राप्तीसाठी सकारात्मक विचारांचा माध्यम म्हणून उपयोग करण्याची आपल्याला सतत जाणीव होणे आवश्यक असते. आनंदाची गोडी अवीट असते, त्यामुळे आनंदप्राप्तीचा कधीच वीट येत नाही. आनंदाची प्राप्ती करण्यासाठी सकारात्मक विचार, वर्तन, व्यवहाराची गरज असते. त्यायोगेच सकारात्मक वातावरणाची निर्मिती होऊ शकते. आनंदाची निर्मिती आपल्याच अंतरंगांत करावी लागत असते. आनंद प्राप्ती म्हणजेच खरी यशप्राप्ती असते; हे ज्या व्यक्तीला समजते, त्याच व्यक्तीला त्याच्या जीवनातील सार कशात आहे, हेही कळू शकते. अंतरात्म्याला शांती मिळणे अत्यंत जरुरीचे असते, कारण त्यातच खरा आनंद असतो. आपल्या दैनंदिन गरजा भागवताना आपण केवळ शरीराचाच विचार करत असतो. अन्न, वस्त्र, निवारा ह्या तीनही गरजा खरे तर आपल्या शरीरासाठी आवश्यक असतात. आपल्याला त्या व्यतिरिक्त अजून एका गोष्टीची गरज असते, ती म्हणजे शांतीची.



आधुनिक केसरी

**पाहता स्वरूप | धन्य झालो ||**
पावलांना ओढ | पंढरीची लागो ||
ध्यास मना लागो | आळंदीचा ||१||
काया वाचा आता | देहुत नांदावी ||
पाऊली खेळावी | नाथा घरी ||२||
अभिर गुलाल | उधळावा नित्य ||
वाणी बोले सत्य चोखोबाची||३||
मातीशी अद्वैत | साधावे अभंग ||
गोरोबाचा संग | घडो जीवा ||४||
चंद्रभागा दावी | परब्रम्ह रूप ||
पाहता स्वरूप | धन्य झालो ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरुपण

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

नश्यते सकला चिन्ता ध्यानेन तव मातृके|
तापत्रयविनाशाय दुर्गां देवीं नमाम्यहम्||
१९||
माते, तुझे ध्यान केल्याने सर्व चिंता नष्ट होते. अशा तुला दुर्गा देवीला तीनही तापांच्या शांतीसाठी मी नमन करतो.

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

कुकुही जल दरियाव में, जल क्रीड़ा जल साथ । जल निर्लेप उड़ गगन को, सन्त गृही त्यों साथ ।।०६।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल दशम अध्याय) ०४/१०/०६

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**

पाणबुडी पक्षी जलसागरात पाण्याबरोबर राहातो, त्या पाण्यात तो क्रीडा करतो आणि या जलापासून निर्लेप होऊन आकाशात उडून जातो. तद्वतच गृहस्थ संत माया प्रपंचात राहूनही आपल्या चेतन सुरति द्वारे शुध्द चिदाकाशात उडतात आणि परमानंदाचा उपभोग करतात. पाणबुडी पक्ष्याप्रमाणे या माया प्रपंचात राहूनही त्यापासून असंग राहून ते आत्मानंदात निमग्न असतात.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# तुकाराम गाथा

आधुनिक केसरी


काय तो तयाचा लेखावा अन्याय । हित नेणे काय आपुलें तें ॥ध्रु.॥
शुकें नळिकेशीं गोवियेले पाय । विसरोनि जाय पक्ष दोन्ही ॥२॥
तुका म्हणे एक ऐसे पशुजीव । न चले उपाव कांहीं तेथें ॥३॥
हरि तूं निष्ठ निर्गुण । नाहीं माया बहु कठिण । नव्हे तें करिसी आन । कवणें नाहीं केलें तें ॥१॥ घेऊनि हरिश्चंद्राचें वैभव । राज्य घोडे भाग्य सर्व । पुत्र पत्नी जीव । डोंबाघरीं वोपविलीं ॥ध्रु.॥
नळा दमयंतीचा योग । बिघडिला त्यांचा संग । ऐसें जाणे जग । पुराणें ही बोलती ॥२॥ राजा शिबी चक्रवर्ती । कृपाळु दया भूतीं । तुळविलें अंतीं । तुळें मास तयाचें कर्ण भिडता समरंगणीं । बाणीं व्यापियेला रणीं । मागसी पाडोनी । तेथें दांत तयाचे बळी सर्वस्वें उदार । जेणें उभारिला कर । करूनि काहार । तो पाताळीं घातला श्रियाळाच्या घरीं । धरणें मांडिलें मुरारी । मारविलें करीं । त्याचें बाळ त्याहातीं तुज भावें जे भजती । त्यांच्या संसारा हे गति । ठाव नाहीं पुढती । तुका म्हणे करिसी तें
चाल केलासी मोकळा । बोल विठ्ठल वेळोवेळां ॥१॥
तुज पापचि नाहीं ऐसें । नाम घेतां जवळीं वसे ॥ध्रु.॥
पंच पातकांच्या कोडी । नामें जळतां न लगे घडी ॥२॥
केलीं मागें नको राहों । तुज जमान आम्ही आहों ॥३॥
करीं तुज जीं करवती । आणिक नामें घेऊं किती ॥४॥
तुका म्हणे काळा । रीग नाहीं निघती ज्वाळा ॥५॥
बाळ बापा म्हणे काका । तरी तो कां निपराध ॥१॥
जैसा तैसा भाव गोड । पुरवी कोड विठ्ठल ॥ध्रु.॥

# वासनानाश हाच मोक्ष

आधुनिक केसरी

पुष्कळदा भक्ति म्हणजे काय, किंवा परमार्थ कशाला म्हणतात, हेच आपल्याला कळत नाही. ज्याला प्रपंच नीट करता येत नाही, त्याला नाही परमार्थ करता येणार. प्रपंचाला कंटाळून भक्ति नाही येणार. कंटाळा प्रपंचाचा येण्यापेक्षा, विषयांचा आला पाहिजे. मला सुख हवे हा प्रत्येक जीवाचा मुख्य हेतू असतो. मोक्ष म्हणजे निरतिशय सुखाचा अनुभव होय. 'जिवंतपणी मिळालेली आत्यंतिक सुखाची स्थिति' अशी मोक्षाची व्याख्या करता येईल.

खरोखर, भगवंताजवळ काय कमी आहे ? एक आपले मन त्याला द्यावे आणि त्याची श्रद्धायुक्त भक्ती करावी. काळजी करणे म्हणजे भगवंतावर भरवसा नसणे होय. प्रारब्धावर देह टाकणे ही खरी संन्यासवृत्ती होय. वासना न ठेवता आपल्या हातून कर्मच होत नाही, त्याला काय करावे ? माझे समाधान माझ्याजवळ असताना, दुसरीकडे ते मिळेल असे आपल्याला वाटते, हेच आपले चुकते. हवेपण संपले नाही तोपर्यंत समाधान नाही. हव्यास मरेपर्यंत सुटतच नाही; हे सर्व रोगांचे मूळ आहे. आणि म्हणूनच; ज्याची वासना नाहीशी झाली तो मोक्षत्वाला गेला खरा. आशेची



निराशा झाली नाही तोपर्यंत भगवंताचा दास नाही होता येणार. आशा जेव्हा मनात उठेल तेव्हा ती भगवंताला अर्पण करावी. प्रत्येकाला वाटते, मी श्रीमंत व्हावे, पण कितीजण तसे होतात ? म्हणजे ती निराशाच नाही का ? प्रपंच खरोखरीच नाटकासारखा आहे. नाटकामध्ये एखादा मनुष्य राजा झाला काय किंवा भिकारी झाला काय, प्रत्यक्ष जगामध्ये त्याला किंमत नाही. उलट, भिकाऱ्याचे काम करणाऱ्याने जर ते उत्तम केले, तर लोक त्याचे कौतुक करतात. तसे, प्रपंचामध्ये कुणी श्रीमंत असला काय आणि गरीब असला काय, याला महत्त्व नसून, त्याने भगवंताचे अनुसंधान किती ठेवले याला खरे महत्त्व आहे. आपण पैसा साठविला तर गैर नाही, पण त्याचा आधार न वाटावा. अनुसंधानाच्या आड त्याला येऊ देऊ नये. विषयावर जोपर्यंत तुमचे सुख अवलंबून आहे, तोपर्यंत भक्तीचे खरे सुख मिळत नाही. एक भगवंतच मनापासून हवा असे वाटले, म्हणजे तो प्राप्त होतो. 'मी करतो' असे कधीच म्हणू नये. मी आपल्या तपश्चर्येने भगवंताला पाहीन असे जो म्हणतो, त्याला भगवंताचे दर्शन होणे कठीण असते. विषय मिळाला नाही म्हणजे तळमळ लागते, त्याप्रमाणे भगवंत भेटला नाही तर तळमळ लागावी. आजच्या आपल्या स्थितीत आपल्याला काय करता येणे शक्य आहे, हे प्रथम पाहावे. परमार्थ समजून जो त्याचे आचरण करील, त्याला तो लवकर साधेल. त्त्या माणसाला प्रपंच सोडून जाण्याचे कारण उरणार नाही.

**१६१. हवे व नको याचा आग्रह नसावा. यातच वासनेचे मरण आहे.**

# निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

प्रत्यहं प्रत्यवेक्षेत नरश्चरितमात्मनः ।
किं नु मे पशुभिस्तुल्यं किं नु सत्पुरुषैरिति ॥

स्पष्टीकरण - माणसाने आपल्या मनावर आणि आचरणावर रोजचा अंकुश ठेवला पाहिजे. रात्री झोपण्यापूर्वी आपण आपल्यालाच विचारावे की, आज मी कोणाशी कसा वागलो ? असत्य बोललो का ? उद्धटपणाने कोणाचा अपमान केला का ? करू नये ते केले. का ? एखाद्याला फसवले का ? अशी तुम्ही तुमच्या मनाची हजेरी घेतलीत, की तुमचे मन आपोआप सन्मार्गावर राहील. मनाला वळण लावण्याचा हा एक उत्तम मार्ग आहे.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

बुधवार, १४ जून २०२३

adhunikkesari.com Adhunik Kesari


# देशाला २०४७ पर्यंत विश्वगुरू करायचे मोदी यांचे स्वप्न

## डॉ. भागवत कराड : खुलताबाद येथे महाजनसंपर्क अभियानांतर्गत व्यापारी संमेलन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पंतप्रधानपद होऊन ९ वर्षे पूर्ण झाली आहे ९ वर्षांत मोदी सरकारने विविध कल्याणकारी योजना उपलब्ध करून दिल्या व देशात शेकडो विकास कामे मार्गी लावले. यामुळे देश हा अर्थ व्यवस्थेत ९ व्या क्रमांकावरून पाचव्या क्रमांकावर आला आहे. आता भारत देशाला २०४७ साला पर्यंत विश्व गुरू बनवण्याचे स्वप्न मोदी सरकारचे आहे, अशी माहिती केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉक्टर भागवत कराड यांनी खुलताबाद येथे महा जनसंपर्क अभियान' व्यापारी संमेलनाच्या बैठकीत दिली. केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉक्टर भागवत कराड व आमदार प्रशांत बंब यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजपच्या वतीने सोमवार रोजी सकाळी १२ वाजेच्या सुमारास खुलताबाद नगरपालिका सभागृहात महा जनसंपर्क अभियान' व्यापारी संमेलनाची बैठक संपन्न झाली. या बैठकीत तालुक्यातील शेकडो व्यापारी मोठया संख्येने उपस्थित होते बैठकीत भागवत कराड आमदार बंब यांनी शहरासह तालूक्यातील व्यापाऱ्यांशी संवाद साधला व त्यांची व्यथा जाणुन घेतली.व्यापाऱ्यांनी त्यांच्या समस्या मांडली व त्यांच्या प्रश्नांवर डॉ. कराड यांनी समाधानपूर्वक उत्तर देत त्यांना जीएसटी व इतर करांविषयी होणाऱ्या अडचनी नोंद करून घेतली. बैठकीत डॉ भागवत कराड म्हणाले की, देशाच्या स्वातंत्र्यानंतर 9 वर्षातील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकार सर्वच आघाड्यांवर प्रभावी ठरले आहे. सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण या विचारधारेवर काम करणाऱ्या पंतप्रधान



नरेंद्र मोदी यांनी वैश्विक स्तरावर देशाला एक वेगळी ओळख मिळवून दिली आहे. आज भारताकडे जगातील अनेक देश विविध कारणांसाठी आशेने पाहू लागले आहेत, हिच खरी मोदींच्या नेतृत्वाची किमया आहे, असे मत केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराडयांनी व्यक्त केले.केंद्रातील सरकारला नऊ वर्ष पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या महा जनसंपर्क अभियानाच्या निमित्ताने नगरपरिषद सभागृहात आयोजित व्यापारी सम्मेलनात ते बोलत होते. यानंतर डॉ. कराड यांनी पत्रकार परिषद घेत मोदी सरकारचे ९ वर्ष सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण या उपक्रमाविषयी मोदी सरकार ने केलेल्या कामांची पावती देत केंद्र सरकारची सशक्त शेतकरी समृद्ध भारत, नारी तु नारायणी महिला सशक्तिकरण, सुशक्त बनती भारत की अमृत पीढ़ी, निरोगी जीवन सबका अधिकार, सशक्त भारत, अभूतपूर्व विकास अश्या अनेक योजनांविषयी पत्रकारांना माहिती दिली. महा जनसंपर्क अभियान' व्यापारी संमेलनाची बैठकी दरम्यान जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष एल.जी. गायकवाड, मुरलीधर दांडेकर, व्यापारी संमेलन प्रमुख तथा नगरसेवक योगेश बारगळ माजी महापौर बापु घडामोडे, भाजप जिल्हा निवडणूक प्रमुख समीर राजुरकर गंगापूर तालूका अध्यक्ष शिवनाथ मालकर खुलताबाद तालूका अध्यक्ष प्रकाश वाकळे, शहराध्यक्ष सतीश दांडेकर, माजी सभापती गणेश आधाने, माजी उपसभापती दिनेश अंभोरे, युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष संदीप निकम, विकास कापसे, माजी उपनगराध्यक्ष सुरेश मरकड, नवनाथ बारगळ, अविनाश कुलकर्णी, ज्ञानेश्वर नलावडे, भाजप जिल्हा कार्यकारणी सदस्य ज्ञानेश्वर बारगळ, संतोष घुसिंगे, युवराज ठेंगडे, किशोर, भावसार, परसराम बारगळ, प्रकाश चव्हाण, राजु ठेंगडे, शंकर अंभोरे, अनिस शेख, काशिनाथ तुपे, आशोक तुपे आदींची उपस्थिती होती.



लोकमत मीडिया ग्रुपचा आंतरराष्ट्रीय स्तरावरील 'एक्सलन्स इन सोशल जर्नलिझम अवार्ड मिळाल्याबद्दल महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांचा केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या.सोबत डॉ. अमोल लहाने, जनप्रबोधनचे सुभाष धस.

## दोन गटांत सशस्त्र हाणामारी

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** खामगाव तालुक्यातील वरुड येथे जुन्या वादातून दोन गटांत तुफान हाणामारी झाली. या सशस्त्र हाणामारीत १९ जण जखमी झाले असून सात गंभीर जखमींवर अकोला येथे उपचार सुरू आहे. गावात आज दुसऱ्या दिवशीही तणाव आणि कडक बंदोबस्त कायम आहे. या हाणामारीत एकनाथ कोकाटे (४०), वैष्णवी कोकाटे (२४), शारदा कोकाटे (३२), शुभांगी कोकाटे (३२), अविनाश कोकाटे (२६), आकाश कोकाटे (२३), मारुती कोकाटे (४०), लोकेश कोकाटे (२३), योगेश कोकाटे (२६), संतोष कोकाटे (२६), रूपेश काकाटे (६०), मंगेश तायडे (३६), पूजा तायडे (२४), ललिता सोनोने (५५), सागर सोनोने (३२), विशाल सोनोने (४०), तपस्या सोनोने (१२) जखमी झाले आहेत.

## शार्पशूटर खान मुबारकचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** अंडरवर्ल्ड हा नेहमीच फक्त



मुंबईकरच नाही तर तमाम भारतीयांसाठी चर्चेचा आणि कुतुहलाचा विषय राहिला. मुंबई अंडरवर्ल्डमधील बरेच कुख्यात गँगस्टर्स हे इतर राज्यांमधून मुंबईत आले होते. त्यामुळे देशभर अंडरवर्ल्डचे कनेक्शन्स होतेच. ९० च्या दशकात मुंबई पोलिसांनी अंडरवर्ल्डचे कंबरडं मोडलं आणि ही चर्चा काहीशी विरळ झाली. मात्र, अजूनही अंडरवर्ल्डबाबतचे गूढ कायम आहे. हा अंडरवर्ल्डचा इतिहास आपल्यावरील गुन्ह्यांच्या स्वरूपात अजूनही वागवणारे काही कुख्यात गँगस्टर्स देशातील वेगवेगळ्या तुरुंगांत शिक्षा भोगत आहेत. त्यातलाच एक म्हणजे खान मुबारक याचा नुकताच उत्तर प्रदेशमध्ये मृत्यू झाला आहे.

खाब मुबारक हा कुख्यात अंडरवर्ल्ड डॉन छोटा राजनसाठी शार्पशूटर किंवा हिटमॅन म्हणून काम करायचा. अनेकांच्या सुपाऱ्या छोटा राजनने खान मुबारकच्याच भरवशावर घेतल्या होत्या. त्यामुळेच खान मुबारकवर आत्तापर्यंत हत्या, सशस्त्र लुटमार आणि दरोड्यांचे तब्बल ४४ गुन्हे दाखल होते. एप्रिल महिन्यात उत्तर प्रदेश पोलिसांनी जारी केलेल्या ३१ अट्टल गुन्हेगारांच्या यादीत खान मुबारकचा समावेश होता. छोटा राजनबरोबरच त्याचा मोठा भाऊ झफर सुपारी याच्यासाठीही खान मुबारकने काम केल्याची माहिती स्पेशल टास्क फोर्सच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे. २००६ मध्ये खान मुबारकनं मुंबईत चक्क पोलीस कोठडीतल्या दोन व्यक्तींची हत्या केली. या दोघांना गोळ्या घालून खान मुबारकनं ठार केलं. काला घोडा परिसरातील पोलीस चौकीत हा प्रकार घडला. या दोन्ही व्यक्ती पोलीस व्हॅनमध्ये असताना त्यांच्यावर खानने गोळ्या झाडल्या.

## मुख्याधिकारी निवेदनाची दखल घेत नसल्याने दिला आंदोलनाचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** नगर परिषद परतूर हद्दीतील अक्षय नगर परतूर येथील भुमीगत गटार योजना अंतर्गत बनविलेल्या चेंबरमधून घाण पाणी रस्त्यावर जमा होत असल्यामुळे नालीमधील पाणी जाण्यासाठी विकासमार्ग मोकळा करुन देण्यात यावा . तसेच नाली व रस्त्याचे काम तात्काळ सुरु करावे .

अक्षय नगर भागातील रहिवासींयानी अनेकवेळा परतूर न.प. विनंती अर्ज निवेदने सादर करण्यात आले असून पालिका प्रशासन कोणत्यादी प्रकारच्या हालचाली करित नसल्याने निवेदनात नमुद असलेल्या भांगात विकास कमे तात्काळ सुरु न केल्यास वरील ठिकाणचे कायमस्वरुपी रहिवासी असुन आम्ही सर्वच जण अंदोलन उभारू असे निवेदनात म्हटले आहे. नगर परिषद परतूर हद्दीतील अक्षय नगर परतूर येथील बिलाल मस्जीदच्या पाठीमागील बाजूस असलेला नगर परिषद रस्ता व नालीचे बांधकाम सुमारे १५ वर्षापूर्वी करण्यात आले होते, परंतु भुमीगत गटार योजना राबविण्यासाठी सदरील रस्त्याचे मधोमध खोदकाम करुन त्यामध्ये पाईपलाईन व चेंबर करण्यात आले व पुर्वी अस्तीत्वात असलेला रस्ता नादुरुस्त करण्यात आला व त्यानंतर सदर रस्त्याची कोणतीही दुरुस्ती करण्यात आली नाही, तसेच नालीचे सुध्दा बांधकाम करण्यात आले नाही. सदर रस्ता व नाली करणे बाबत बऱ्याच वेळा विनंती अर्ज व समक्ष भेटून विनंती केली. तसेच सध्या पावसाळयाचे दिवस येत असून पावसाचे पाणी जाण्यासाठी नाली नसल्यामुळे सदरचे पाणी घरामध्ये घुसण्याची



शक्यता आहे. सदरचे पाणी रस्त्यावर साचत असल्यामुळे रोगराई, तसेच संसर्गजन्य होईल तसे आमची मागणी पूर्ण नाही झाली आम्ही आंदोलन करणार आमदार साहेबांच्या कार्यालयावर यांची दखल नगरपरिषद मुख्य अधिकारी साहेबांनी घेण्यात यावे असे निवेदन सादर करण्यात आला. शेरखान पठाण यांनी वेळोवेळी अधिकार्यांना फोन लावून स्वच्छता करण्याची मागणी केली असून त्यांच्यावर दुर्लक्ष करण्यात आहे. यावेळी असलम शेख, सुनील आखाडे, शेख हबीब, शेख असेल,भारत गोटे, अभिजीत आखाडे, सचिन गोटे, सुधीर आखाडे, सादिक शेख ,अल्ताफ शेख, इस्माईल पठाण, शाहरुख शेख आदी नागरीक उपस्थित होते.




# बर्लुस्कोनी कालवश

आधुनिक केसरी

इटलीचे माजी पंतप्रधान व अब्जाधीश सिल्व्हिओ बर्लुस्कोनी यांचे सोमवारी निधन झाले. ते ८६ वर्षांचे होते. गेल्या काही वर्षांपासून ते हृदयविकार आणि कर्करोगाने ग्रस्त होते. आपल्या ऐषोरामी-चैनीच्या जीवनशैलीमुळे बर्लुस्कोनी अनेकदा वादग्रस्तही ठरले. भ्रष्टाचाराचे आणि चैनीच्या जीवनशैलीचे आरोप असलेल्या बर्लुस्कोनी यांनी इटलीचे पंतप्रधानपद सर्वाधिक काळ भूषवले. त्यांच्या मालकीच्या 'मीडियासेट टेलिव्हिजन नेटवर्क'समूहाने त्यांची हसरी मुद्रा प्रसिद्ध करून, त्यांच्या मृत्यूची बातमी देताना 'बर्लुस्कोनी हयात राहिले नाहीत' असे नमूद केले आहे. बर्लुस्कोनी यांना रक्ताच्या कर्करोगाच्या उपचारासाठी दुसऱ्यांदा शुक्रवारी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांना अनेक वर्षांपासून हृदयविकार, प्रोस्टेट कर्करोगाचा त्रास होता. २०२० मध्ये करोनाग्रस्त झाल्यानंतर त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. बर्लुस्कोनी यांचा जन्म २९ सप्टेंबर १९३६ रोजी मिलानमधील एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. त्यांनी कायद्याची पदवी मिळवली होती. वयाच्या २५ व्या वर्षी त्यांनी बांधकाम व्यवसाय सुरू केला आणि मिलानच्या बाहेरील परिसरात मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी अनेक निवासी संकुले उभारली.एके काळी सागरी पर्यटन करणाऱ्या जहाजांवर (क्रूज शिप) गाणी गाणाऱ्या बर्लुस्कोनी यांनी आपल्या यशस्वी प्रदीर्घ राजकीय कारकीर्दीसाठी आपल्या वाहिनीच्या देशव्यापी जाळय़ाचा आणि अफाट संपत्तीचा वापर केला. ते तीनदा इटलीचे पंतप्रधान झाले. त्यांना आपल्या राजकीय कौशल्यातून इटलीचा जागतिक स्तरावरील प्रभाव वाढवण्यासाठी प्रयत्न केले, असे दावा त्यांचे समर्थक करतात. मात्र, त्यांच्या विरोधकांच्या मते ते लोकानुनय करणारे नेते होते. त्यांनी स्वत:ला आणि आपल्या व्यवसायाला प्रबळ करण्यासाठी राजकीय शक्तीचा एखाद्या अवजाराप्रमाणे वापर केला. मात्र, तसे करताना त्यांनी इटलीतील लोकशाही यंत्रणा कमजोर केली. २००१-०६ मध्ये बर्लुस्कोनी यांची पंतप्रधानपदाची दुसरी कारकीर्दही गाजली. या काळात इटलीचे पंतप्रधानपद दीर्घकाळ भूषवणारे नेते अशी त्यांची ओळख बनली. तसेच तत्कालीन अमेरिकन अध्यक्ष जॉर्ज डब्ल्यू. बुश यांच्याशी मैत्रीचे संबंध राखत त्यांनी जागतिक स्तरावर आपला प्रभाव वाढवून प्रतिमा उंचावली होती. अलिकडे वयाच्या ८२ व्या वर्षी ते युरोपियन संसदेवर निवडून गेले. गेल्या वर्षी इटालियन सिनेटवरही त्यांची निवड झाली होती. मेलोनी या कट्टर उजव्या विचारसरणीच्या मानल्या जातात. मात्र, बर्लुस्कोनी यांनी सरकारमधील कोणतेही पद स्वीकारले नव्हते.



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

# उपासमारीचे आव्हान आणि अन्नाची नासाडी

आधुनिक केसरी

**अलीकडेच, संयुक्त राष्ट्रांच्या पर्यावरण कार्यक्रमाने अन्न नासाडी निर्देशांक जाहीर केला. अन्नाच्या नासाडीसंदर्भात समोर आलेली आकडेवारी चिंताजनक आहे. अहवालानुसार, 2019 मध्ये, जगभरात एकूण 93 कोटी 10 लाख टन अन्न वाया गेले, त्यापैकी 61 टक्के घरांमध्ये, 26 टक्के रेस्टॉरंट आणि 13 टक्के रिटेल क्षेत्रात वाया गेले, म्हणजे सुमारे 17 टक्के जागतिक अन्न उत्पादन वापराऐवजी वाया गेले. जागतिक स्तरावर एक व्यक्ती एका वर्षात एकशे एकवीस किलो अन्न वाया घालवते हे आश्चर्यकारक आहे. अन्नाच्या नासाडीच्या बाबतीत भारताची स्थिती इतर दक्षिण आशियाई देशांपेक्षा थोडी बरी आहे, पण इथली व्यक्ती एका वर्षात सुमारे पन्नास किलो अन्न वाया घालवते.**

शेजारील अफगाणिस्तानमधील एक व्यक्ती वर्षभरात सरासरी ८२ किलो अन्न वाया घालवते, तर नेपाळ आणि भूतानमध्ये ऐंशी, श्रीलंकेत छहत्तर, पाकिस्तानात चौहत्तर, बांगलादेशात पासष्ट आणि मालदीव मध्ये एकाहत्तर टक्के अन्नाची नासाडी होते. वास्तविक, अन्न फेकण्याच्या सवयीने जगभर वाईट संस्कृतीचे रूप धारण केले आहे.सर्व विकसित, विकसनशील आणि अविकसित देशांमध्ये अन्नाची नासाडी ही एक गंभीर आणि वाईट समस्येचं रूप धारण करत आहे. अन्नाची नासाडी अशीच होत राहिल्यास २०३० पर्यंत जगभरातील भूक निर्मूलनासाठी संयुक्त राष्ट्रांनी दिलेले 'झिरो हंगर'चे लक्ष्य गाठणे आणखी कठीण होईल.संयुक्त राष्ट्रच्या म्हणण्यानुसार, जगातील प्रत्येक नऊपैकी एक व्यक्ती पुरेसे अन्न आणि आवश्यक पोषक तत्वांपासून वंचित आहे.जगभरात एड्स, मलेरिया आणि टीबीसारख्या आजारांनी न मरणाऱ्यांपेक्षा जास्त लोक उपासमारीने मरतात, असे आकडेवारीवरून दिसून येते. संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम( UNDP ) च्या अहवालानुसार, जगात गरिबांची संख्या सुमारे 130 कोटी आहे. जागतिक बँकेच्या अहवालात असे म्हटले आहे की, जगातील सर्वात गरीब लोक भारतात आहेत.

किंबहुना वाढती लोकसंख्या, घटते कृषी उत्पादन आणि अन्नधान्याची नासाडी यामुळे जगभर उपासमारीच्या समस्या झपाट्याने वाढल्या आहेत.कृषी मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार भारतात दरवर्षी सुमारे पन्नास हजार कोटी रुपयांचे अन्न वाया जाते. एवढे अन्न बिहारसारख्या राज्याच्या एकूण लोकसंख्येला वर्षभर पुरू शकते! विशेष म्हणजे इंग्लंडमध्ये दरवर्षी जेवढे अन्न वापरले जाते तेवढेच अन्न आपण वाया घालवतो! अन्नाच्या नासाडीशी संबंधित हे आकडे भयावह चित्र मांडतात. अर्थात, भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा अन्नधान्य उत्पादक देश आहे, परंतु ग्लोबल हंगर इंडेक्स ( 2020 ) मध्ये आपण जगातील सर्वाधिक भुकेल्या देशांच्या यादीत 94व्या क्रमांकावर आहोत, जे 2019 मध्ये एकशे दोन होते. अन्नाची नासाडी रोखण्यासाठी देशात कोणताही कायदा नाही, तसेच ते थांबवण्यासाठी नागरिकांमध्ये पुरेशी जागृतीही नाही. त्यामुळे अन्नाची नासाडी रोखल्याशिवाय आणि कुपोषण, उपासमार यासारख्या समस्यांना तोंड न देता भारत विकसित आणि बलाढ्य देशांच्या पंक्तीत सामील होऊ शकेल का, असा प्रश्न उपस्थित होतो.

खरे तर अन्न वाया घालवण्याच्या प्रवृत्तीने सामाजिक दुर्गुणाचे रूप घेतले आहे.लग्नसमारंभ, सण वगैरे प्रसंगी ताटात जास्त अन्न घेऊन ते अर्धवट सोडून देण्याची फॅशन झाली आहे. अन्नाची नासाडी करणे हा सामाजिक आणि नैतिक गुन्हा आहे, पण ते करताना आपण त्याचे पर्यावरणीय, सामाजिक आणि आर्थिक परिणामांचा विचार करत नाही. जे अन्न आपण ताटात सहज सोडतो किंवा डस्टबिनमध्ये फेकतो ते फक्त धान्यच नाही तर ते तयार करण्यासाठी लागणारी ऊर्जा, कार्बन, पाणी आणि पोषक तत्वांचाही अपव्यय होतो. तृणधान्ये पिकवण्यासाठी मोठ्या प्रमाणात पाण्याची आवश्यकता असते. दुष्काळी भागात जिथे पावसाच्या पाण्याची कमतरता आहे, तिथे शेतीसाठी विविध जलस्रोतांमधून पाणी काढले जाते. अशा परिस्थितीत अन्नाची नासाडी थांबवून आपण जमीन आणि जलस्रोतांवर पडणारा अनावश्यक दबाव कमी करू शकतो. अन्नाच्या नासाडीमुळे पर्यावरणाचे दुष्परिणामही समोर येत आहेत. एका संशोधनानुसार अन्नाच्या नासाडीमुळे हरितगृह वायूंचे प्रमाण आठ ते दहा टक्क्यांनी वाढते. हरितगृह वायूंच्या उत्सर्जनामुळे जागतिक तापमानात वाढ होत असतानाच त्याचा





परिणाम धान्य उत्पादनावरही होत आहे. त्यामुळे पाण्याचे स्रोतही दूषित होऊन ते पुन्हा पिण्याच्या पाण्यातून आरोग्याच्या समस्यांना जन्म देतात.

अन्नाचा अपव्यय कमी करण्यासाठी जगभरातील अनेक भागांमध्ये सरकारी धोरणे आणि जनजागृतीद्वारे अनुकरणीय उपक्रम घेतले जात आहेत. जगातील अनेक देशांनी 2030 पर्यंत ( मिलेनियम डेव्हलपमेंट गोलचे लक्ष्य वर्ष ) अन्नाचा अपव्यय निम्मा करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. या मोहिमेत सर्वप्रथम ऑस्ट्रेलिया पुढे आला. ऑस्ट्रेलियातील अन्न नासाडीमुळे ऑस्ट्रेलियन अर्थव्यवस्थेला दरवर्षी 2 कोटी डॉलर खर्च येतो. अन्न नासाडी कमी करण्यासाठी ऑस्ट्रेलियन सरकारने संबंधित संघटनांना प्रोत्साहन देण्यासाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली आहे. त्याचप्रमाणे नॉर्वेमध्ये, जिथे दरवर्षी साडेतीन लाख टन अन्न डस्टबिनमध्ये फेकले जाते, ऑस्ट्रेलियाच्या मार्गावर चालत, 2030 पर्यंत अन्नाचा अपव्यय निम्म्याने कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. अन्नाची नासाडी रोखण्यासाठी चीनने 'ऑपरेशन एम्प्टी प्लेट'चे धोरण राबवले. चीनमध्ये एक व्यक्ती एका वर्षात सरासरी चौसष्ट किलो अन्न वाया घालवते. पण या धोरणांतर्गत लोक आणि रेस्टॉरंटना ताटात अन्न सोडल्याबद्दल दंड आकारला जात आहे. 2016 मध्ये, सुपरमार्केटला न विकलेले अन्न फेकून देण्यावर बंदी घालणारा फ्रान्स जगातील पहिला देश बनला.

फ्रान्स आणि इटलीसारख्या देशांमध्ये न विकलेले अन्न धर्मादाय संस्थांना देण्यावर भर आहे. त्याचप्रमाणे, कोपनहेगन, लंडन, स्टॉकहोम, ऑकलंड आणि मिलान सारख्या मोठ्या शहरांमध्ये अतिरिक्त अन्न स्वतंत्रपणे गोळा केले जाते आणि गरजूंना वाटले जाते. भारतातही अनेक संस्थांनी पुढे येऊन 'रोटी बँक' सुरू केली आहे. ही बँक शहरातील गरजूंना अन्न वाटपाचे काम करते. अन्नाची नासाडी करणाऱ्या हॉटेल्स, रेस्टॉरंट्स आणि लग्नघरांना पाच लाख रुपयांपर्यंतचा दंड ठोठावण्याचा भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण विचार करत आहे. दरम्यान, अलीगड हॉटेल आणि रेस्टॉरंट असोसिएशनच्या एका अनोख्या उपक्रमाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. जे ग्राहक तिथल्या हॉटेल्स आणि रेस्टॉरंटमध्ये जेवणही सोडत नाहीत, त्यांना बिलात पाच टक्के सवलत दिली जात आहे. त्याचबरोबर तेलंगणातील एका हॉटेलमध्ये थाळीत अन्न सोडणाऱ्यांकडून पन्नास रुपये दंड वसूल करण्यास सुरुवात करण्यात आली आहे. अन्नाची नासाडी रोखण्यासाठी असे प्रयोग आणि केले जाणारे प्रयत्न कौतुकास्पद आहेत. मात्र, नागरिकांमध्ये सामाजिक भान जागृत करूनच या दुष्कृत्यांपासून मुक्ती मिळू शकते. अन्नाची नासाडी रोखणे अवघड काम नाही. आपण आपले विचार विस्तृत करून आणि आपल्या सवयी बदलून हे थांबवू शकतो.



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

# जागतिक रक्तदाता दिन

आधुनिक केसरी

**आज १४ जून, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक रक्तदान दिन म्हणून साजरा केला जातो. ऑस्ट्रेलियातील डॉ कार्ल लॅडस्टेनर या संशोधकाच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस जागतिक रक्तदाता दिन म्हणून साजरा केला जातो. १४ जून हा त्यांचा जन्मदिन आहे. डॉ कार्ल लॅडस्टेनर यांनी 'एबीओ' हा नवा रक्तगट शोधून काढला त्यांच्या या संशोधनासाठी त्यांना नोबेल पारितोषिक मिळाले होते. पहिला जागतिक रक्तदाता दिन २००५ साली साजरा झाला होता. त्यानंतर दरवर्षी हा दिवस साजरा केला जातो. प्रत्येक वर्षी एक सूत्र घेऊन हा दिवस साजरा केला जातो. माता सुरक्षा, रक्तदान श्रेष्ठ दान, डोनेट प्लेटलेट्स यासारखे सूत्र घेऊन त्याची माहिती या दिवशी दिली जाते. रक्तदानाचे आवाहन केले जाते. जागतिक आरोग्य संघटनेने घोषित केलेल्या या दिवसाच्या साजरीकरणात रेड क्रॉस सोसायटीचा हिरीरीने भाग असतो.**

कौन्सिल ऑफ युरोप ही संघटना देखील रक्तदाना संदर्भात मोठ्या प्रमाणात जनजागृती करते. आपल्या देशात देखील विविध शासकीय, सामाजिक, सेवाभावी संस्था या दिवसाचे आयोजन करून लोकांमध्ये रक्तदाना संदर्भात जनजागृती करतात. या दिवशी रक्तदात्यांच्या सन्मान केला जातो. रक्तदान शिबिराचे आयोजन केले जाते. रक्तदान श्रेष्ठ दान असं म्हटलं जातं कारण या दानामुळे माणसाचा जीव वाचतो. सुरक्षित रक्त ही अलीकडची वैश्विक समस्या निर्माण झाली आहे. दरवर्षी ९ कोटी युनिटपेक्षा अधिक रक्त दान केले जाते तरीही रक्ताचा तुटवडा जाणवतो. अपघातग्रस्त व्यक्ती, शस्त्रक्रिया झालेले व्यक्ती, रक्तातील त्रुटी असलेले व्याधीग्रस्त व्यक्ती, बाळंतपणात होणारे मातांचे मृत्यू आणि कुपोषण, विविध प्रकारचे बाळ मृत्यू, साथीचे आजार अशावेळी रक्ताची खूप गरज पडते. कोरोना काळात तर रक्ताचा कसा अभूतपूर्व तुटवडा जाणवला होता हे आपण पाहिलेच आहे. कोरोना काळात रक्तदान शिबिरे बंद असल्याने देशात रक्तदानाचा अभूतपूर्व असा तुटवडा जाणवला होता. रक्ताच्या तुटवड्यामुळे अनेक शस्त्रक्रिया पुढे ढकलाव्या लागल्या होत्या. पंतप्रधान आणि मुख्यमंत्री महोदयांनी नागरिकांना रक्तदान करावे असे आव्हान केले होते. भविष्यातही रक्ताचा असा तुटवडा निर्माण होऊ शकतो. आपल्या रक्तामुळे कोणाचा तरी जीव वाचतो. म्हणूनच रक्तदानाला सर्वश्रेष्ठ दान असे म्हणतात. रक्तदानाच्या रूपाने आपण मानवतेला एक मोठी देणगी बहाल करतो. रक्तदान केल्याने कोणतीही इजा किंवा दुष्परिणाम होत नाही. मनुष्याच्या शरीरात ५ लिटर रक्त असते आणि रक्तदानात केवळ ३५० मिली इतकेच रक्त घेतले जाते त्यामुळे कोणतीही कमजोरी जाणवत नाही. विशेष म्हणजे २४ ते ४८ तासात जेवढे रक्त आपण दान दिले आहे तेवढे पूर्ववत होते. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने पुढे येऊन रक्तदान केले पाहिजे. रक्तदान सर्वश्रेष्ठ दान असे म्हणून प्रचार होत असला तरी आपल्याकडे रक्तदात्यांची संख्या खुपच कमी आहे. भारतात फक्त ०.६ टक्केच लोक रक्तदान करीत असतात. १३० कोटी लोकसंख्येच्या देशात हे प्रमाण खूप कमी आहे त्यामुळे देशात रक्ताची खूप कमतरता भासते त्यात कोरोना सारख्या महामारीत तर अभूतपूर्व परिस्थिती निर्माण होते. अपघातातील रुग्ण,



प्रसव काळ, अतिदक्षता विभाग, तातडीच्या शस्त्रक्रिया अशा वेळी रक्ताची गरज निर्माण होते जर रुग्णांना वेळीच रक्त मिळाले नाही तर त्यांचा मृत्यूही होऊ शकतो त्यामुळे प्रत्येकाने सजग राहायला हवे. आपल्या रक्तामुळे कुणाचा तरी प्राण वाचणार आहे. रक्तदान म्हणजे जीवनदान, रक्तदान सर्वश्रेष्ठ दान हे लक्षात घेऊन प्रत्येकाने रक्तदान करायला हवे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# सिंदफणा प्री प्रायमरी शाळेच्या दुसऱ्या शाखेचे उत्साहात उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज



**माजलगाव :** विद्याभवन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिंदफणा पब्लिक स्कूल च्या पूर्व प्राथमिक शाळेच्या दुसऱ्या शाखेचे उद्घाटन माननीय आमदार प्रकाश दादा सोळंके, मंगलाताई सोळंके, आर. बी. अट्टल महाविद्यालयच्या प्राचार्या डॉ. सौ. रजनी शिखरे व समन्वयक नीला देशमुख यांच्या हस्ते शहरातील विवेकानंद नगर येथे झाले. यावेळी व्यासपीठावर डॉ. श्रेयस देशपांडे उपस्थित होते.

उद्घाटनाला उपस्थित मान्यवरांचे स्वागत शाळेच्या बँड पथकाने करण्यात आले. त्यानंतर औपचारिकपणे रिबन कापून शाळेचे उद्घाटन करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत शाळेच्या सचिव आणि मुख्याध्यापकांच्या हस्ते रोपटे देऊन करण्यात आले जे वाढ आणि समृद्धीचे सार दर्शवते आणि प्रोत्साहित करते.

याप्रसंगी बोलताना मुख्याध्यापक अन्वर शेख म्हणाले "शाळेची दुसरी पूर्व-प्राथमिक शाखा असणे हे स्वप्न सत्यात उतरले आहे. या शाळेतील प्रत्येकजण आपल्या शाळेच्या ब्रीदवाक्यानुसार जगतो. दररोज नाविन्यपूर्ण पद्धतींचा अवलंब केला जातो, जो केवळ शैक्षणिकच नाही तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी देखील आहे.

शाळेच्या अस्तित्वाच्या वीस गौरवशाली वर्षांचा आढावा मंगलाताई सोळंके यांनी आपल्या भाषणातून मांडला. मार्च 2023 मध्ये झालेल्या सीबीएसई बोर्डाच्या परीक्षेतील अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय आलेल्या विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांचा सत्कार पाहुण्याच्या हस्ते करण्यात आला.

आर.बी. अट्टल महाविद्यालयच्या प्राचार्या श्रीमती रजनी शिखरे यांनी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांना घडवताना पालक,शिक्षक यांची भूमिका खुप महत्वाची आहे असे प्रतिपादन केले.

शाळेच्या समन्वयक नीला देशमुख यांनी नवीन शाखेच्या उद्घाटन प्रसंगी शुभेच्छा दिल्या तसेच पूर्व प्राथमिक शाळा म्हणजे हसत खेळत शिक्षण असल्याचे त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमात चारशेहून अधिक विद्यार्थी, पालक आणि शिक्षक सहभागी झाले होते विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात शालेय गीते गायली.

शाखेच्या उद्घाटनासाठी समन्वयक नीला देशमुख, उपप्राचार्य राहुल कदम, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# केंद्राने हमीभाव जाहीर करूनही कापसाच्या दरात घसरण

आधुनिक केसरी न्यूज

**रमेश दणके**

**वडोद बाजार :** कापसाच्या दरात घसरण .केंद्र सरकारने हमीभाव जाहीर केल्यानंतर हे कापसाच्या दरात घसरण झाली आहे त्यामुळे शेतकरी चिंतेत सापडला आहे काही शेतकऱ्यांच्या घरात अद्यापही कापूस पडलेला असून कापसाला सात हजाराच्या आत दर मिळत असल्याने शेतकऱ्यांना केंद्र सरकारने हमीभाव जाहीर केल्यानंतर कापसाच्या दरात चांगली वाढ होईल अशी अपेक्षा असतानाही केंद्र सरकारने हमीभाव जाहीर केल्यानंतर कापसाच्या दरात आणखी घसरण झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना घरात असलेल्या कापसाचे चिंता लागली आहे. कापूस दरात घसरण झाली आहे. खरं तर केंद्र सरकारनं हमीभाव जाहीर केल्यानंतर दरात वाढ होण्याची अपेक्षा होती. पण खरिपातील लागवडी सुरु झाल्या तरी अपेक्षित भाव मिळत नाही. तसं पाहिलं तर जून महिना म्हणजे बाजारासाठी ऑफ सिझन आहे. पण डिसेंबरपेक्षा जून महिन्यातील भाव कमी आहेत. कदाचित हे पहिल्यांदाच घडताना दिसत आहे. पण पुढील काही दिवसांमध्ये बाजारातील कापूस आवक कमी होत जाऊन दरात सुधारणा दिसू शकते, असा अंदाज कापूस लावला जात आहे .



केंद्र सरकारनं दोन दिवसांपूर्वी कापूस हमीभावात ९ टक्क्यांची वाढ केली. लांब धाग्याच्या कापसासाठी ७ हजार २० रुपये हमीभाव मिळणार आहे. तर सध्याचे बाजारभावही याच पातळीदरम्यान आहेत. विशेष म्हणजेच जून महिन्यात कापसाचे भाव हमीभावाच्या दरम्यान असल्याची पहिलीचं वेळ असेल, असे शेतकरी आणि व्यापारी सांगतात.

सध्या बाजारात कापसाला सरासरी ७ हजार रुपयांच्या दरम्यान भाव मिळत आहे. मागील आठवड्यात कापसाच्या भावात चांगली वाढ झाली होती. पण दोन दिवसांमध्ये पुन्हा २०० रुपयांनी भाव नरमले. कापसाचे भाव जूनमध्ये दबावात असण्याला काही कारणं आहेत. खरं तर यंदा उत्पादन घटल्यानं चांगला भाव मिळणं अपेक्षित होतं. पण झालं उलटं. सध्या कापसाच्या उत्पादनावरूनही वेगवेगळी मतं आहेत. यंदा सीएआयचा अंदाज २९८ लाख गाठींचा आहे. तर सीसीआय आणि सीओसीपीसी या दोन्हींचा अंदाज ३४३ लाख गाठींचा आहे. म्हणजेच दोन्हीच्या अंदाज ४५ लाख गाठींची तफावत आहे. कापूस अंदाजातील तफावतीचा शेतकऱ्यांना फटका बसत आहे. आणखी खूप कापूस शिल्लक आहे, असं सातत्यानं सांगून दरावर दबाव ठेवला गेला. गेल्या हंगामात मार्च महिन्यानंतर १० ते १२ हजारांचा भाव पाहिल्यानंतर यंदा शेतकऱ्यांनी कापूस मागं ठेवला. यंदाही मार्चनंतर दरात मोठी वाढ होईल, अशी अपेक्षा होती. पण यंदा मार्चनंतर कापूस भावात घट झाली. मे महिन्यात तर निचांकी भाव मिळाला. पण सध्याच्या भावापेक्षा कापूस दरात नरमाई येणार नाही. कारण आता शेतकऱ्यांकडे कापूस कमी आहे. बाजारातील कापूस आवक आता मे महिन्याच्या तुलनेत निम्म्यावर आली. पुढील काळात आवक आणखी कमी होईल. त्यातच खरिपातील लागवडींनाही उशीर होत आहे. त्यामुळे कापूस पिकाची लागवड आणि उत्पादकता याविषयी काहिशी चिंता निर्माण झाली आहे.

# कल्याणी जाधवला सीईटी परीक्षेत 97.55 टक्के

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** कल्याणी गणेश जाधव हिने सीईटी परीक्षेमध्ये 97.55 टक्के घेऊन मारली. शांताराई कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय ताजनापुर, ता.खुलताबाद येथील विद्यार्थ्यांनी कल्याणी गणेश जाधव या विद्यार्थिनी सीईटी परीक्षेमध्ये 97.55/ घेऊन प्रथम क्रमांक मिळवल्या त्याबद्दल संस्थेच्या वतीने गणेश काळे आजी आई व काका यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ग्रामपंचायत सदस्य रावसाहेब देशमुख व सुनील इनामदार राजू सोनवणे इंगळे मॅडम इंगळे मॅडम प्रत्यक्ष आहेर, बहुरे मॅडम इतर सर्व शिक्षक उपस्थित होते.



# मुंबई- पुणे महामार्गावर केमिकल टँकरला आग

आधुनिक केसरी न्यूज

**लोणावळा:** मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर आज सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या एका केमिकल टँकरला अपघात होऊन टँकर रस्त्यामध्ये पलटी झाला व टँकरला भीषण आग लागल्याने मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर आगीचे लोट उसळले आहेत. ही घटना लोणावळा ते खंडाळा दरम्यान असलेल्या कोणेगाव पुलाजवळ घडली आहे. या अपघातामुळे मुंबईच्या दिशेने जाणारी सर्व वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे. या दुर्घटनेमध्ये तीन जण ठार, तर तीन जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे. टँकरने पेट घेतल्यानंतर कोणेगाव पुलाखालील काही वाहने जळाली. त्यामध्ये चार जण ठार, तर तीन जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती असल्याचे पोलिसांनी सांगितले. दरम्यान, राज्याचे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी यासंदर्भात ट्वीट करून शोक व्यक्त केला आहे. "मुंबई-पुणे महामार्गावर झालेल्या एका अपघातात चार जणांचा मृत्यू झाल्याची घटना अतिशय दुर्दैवी आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.



अर्जंट फ्लॅट विकणे आहे

नक्षत्रवाडी येथील गट क्र. 8/1, समर्थ एलक्लेव्हमध्ये पहिल्या मजल्यावरील 2 बीएचके फ्लॅट अर्जंट विकणे आहे. एकूण क्षेत्रफळ 910 स्क्वेअर फूट, क्लिअर टायटल, सीएसएमएसएस कॉलेजपासून पाच ते सात मिनिटांच्या अंतरावर, रम्य वातावरणात, मेन रोडच्या अगदी जवळ,

संपर्क : मो. 7588818406

महाराष्ट्र Business Katta













# मराठवाड्यातील सर्वात भव्य वरमोरा युनिव्हर्स शोरूमचे छत्रपती संभाजीनगरमध्ये अनावरण



आधुनिक केसरी

छत्रपती संभाजीनगर : वरोरा ग्रनिटो, भारतातील अग्रगण्य टाइल्स, सॅनिटरीवेअर आणि बाथवेअर उत्पादक, यांनी छत्रपती संभाजीनगरमध्ये वरमोरा युनिव्हर्स या त्यांच्या नवीन खास आ शोरूमच्या भव्य उद्घाटनाची घोषणा केली. मेसर्स कार्तिक फ्लोअरिंगसह भागीदारीद्वारे, हे ४००० स्केअर फूट शोरूम आधुनिक निवासी आणि व्यावसायिक जागांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी समकालीन डिझाइन, १५ पृष्ठभाग पूर्ण आणि जास्तीत जास्त आकारांसह संपूर्ण अनुभवामध्ये क्रांती घडवून आणण्यासाठी सज्ज आहे.

वरमोरा युनिव्हर्स शोरूम हे छत्रपती संभाजीनगर मधील एक अनोखे ठिकाण आहे, जे ग्राहक, वास्तुविशारद, बांधकाम व्यावसायिक, इंटेरिअर डिझायनर आणि कंत्राटदारांना याआधी कधीही नव्हते असे विस्तृत पर्याय प्रदान करते. उत्पादनांच्या विस्तृत निवडीसह, या खास शोरूमचे उद्दिष्ट उच्च-गुणवत्तेच्या टाइल्स, सॅनिटरीवेअर आणि बाथवेअर सोल्यूशन्स शोधणार्या प्रत्येकासाठी जाण्याचे ठिकाण आहे. वरमोरा युनिव्हर्स शोरूमचे उद्घाटन १२ जून रोजी वरमोरा ग्रनिटो प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक हार्दिक दोशी यांच्या हस्ते, क्रेडाई औरंगाबाद चॅप्टरचे अध्यक्ष विकास चौधरी आणि चेअरमन नीरज दडजाते यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. आय. आय. ए. औरंगाबाद चॅप्टर सन्माननीय अतिथी होते. त्यांचा कार्यक्रम सहभाग उद्योगातील या उपक्रमाच्या महत्त्वावर भर देतो. भावेश वरमोरा, चेअरमन वरमोरा ग्रॅनिटो यांनी नवीन शोरूमबद्दल उत्साह व्यक्त केला. ते म्हणाले, आम्हाला छत्रपती संभाजीनगरमध्ये 'वरमोरा युनिव्हर्स शोरूम सादर करताना खूप आनंद होत आहे, जे आमच्या मौल्यवान ग्राहकांना खरेदीचा एक उल्लेखनीय अनुभव देतात. उद्योगातील आघाडीच्या ब्रँड आणि उत्पादकांपैकी एक म्हणून, वरमोरा ग्रॅनिटोला 'नवीन शैली' प्रदान करण्यात अभिमान वाटतो. टाइल्स, सॅनिटरीवेअर आणि बाथवेअरचे, आमच्या ग्राहकांच्या विकसित होत असलेल्या गरजा पूर्ण करण्यासाठी पृष्ठभाग पूर्ण, डिझाइन आणि आकारांची विस्तृत श्रेणी प्रदान करते. वरमोरा युनिव्हर्स शोरूम वरमोरा ग्रनिटोच्या नाविन्यपूर्ण आणि उत्कृष्टतेच्या वचनबद्धतेचे प्रतिनिधित्व करते. पर्यायांची विस्तृत श्रेणी ऑफर करून, बँडचे उद्दिष्ट आहे की निवासी आणि व्यावसायिक जागांच्या विविध गरजा पूर्ण करून गुणवत्ता आणि डिझाइनचे उद्योग मानके पुन्हा परिभाषित करणे. पृष्ठभागाच्या फिनिश, डिझाईन्स आणि आकारांची विस्तृत श्रेणी शोधा आणि स्वतःला लक्झरी आणि अत्याधुनिकतेमध्ये मग्न करा.

**वरोरा ग्रॅनिटो बद्दलः**

वरोरा ग्रॅनिटो प्रा.लि ही वरमोरा ग्रुपची प्रमुख कंपनी आहे आणि उच्च दर्जाच्या सिरेमिक टाइल्स, बाथ आणि सॅनिटरी उत्पादने आणि इतर बांधकाम साहित्याची आघाडीची उत्पादक आहे. १९९४ मध्ये स्थापित, वरमोरा ग्रेनिटो उद्योगातील सर्वात मोठ्या उत्पादकांपैकी एक बनले आहे, ज्याची घरगुती उत्पादन क्षमता प्रतिवर्ष ३५ एमएसएम आहे. नावीन्य, टिकाऊपणा आणि ग्राहकांचे समाधान यावर लक्ष केंद्रित करून, वरमोरा ग्रेनिटो आपल्या ग्राहकांना जगभरातील सर्वोत्तम उत्पादने आणि सेवा प्रदान करण्यासाठी वचनबद्ध आहे. वरमोरा आता ३१७ अनन्य ब्रँड आउटलेट्स (EBOs) आणि २,०००+ मल्टी-ब्रँड आउटलेट्स (MBOs) चा दावा करते. तुम्ही स्टायलिश टाइल्स, टिकाऊ बाथ आणि सॅनिटरी उत्पादने किंवा इतर बांधकाम साहित्य शोधत असाल तरीही, वरमोरा ग्रॅनिटोने तुम्हाला कव्हर केले आहे. वरमोरा ग्रॅनिटोबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी www.varmora.com ला भेट द्या.









## लघू उद्योग

आधुनिक केसरी

लहान यंत्रांच्या साहाय्याने कमी भांडवलात जो व्यवसाय सुरू केला जातो त्याला लघु उद्योग म्हणतात. असा व्यवसाय बहुतांशी ग्रामीण भारतात केला जातो. जर तुम्हीही नोकरीच्या शोधात असाल आणि अजूनही रिकामे बसले असाल तर तुम्ही हे 10 लघु उद्योगनक्कीच अवलंबू शकता. बेरोजगारांना छोट्या नोकऱ्या उपलब्ध करून देण्यासाठी लघुउद्योगही उपयुक्त ठरतात. छोटया व्यवसायातून तुम्ही हजरो रुपये कमवू शकतात आणि येच छोटे व्यवसाय कधी मोठे होतील तुम्हाला हि समजणार नाहीत फक्त तुम्हाला एकनिष्ठतेने मेहनत करायची आहे.

**1. सोडा व्यवसाय :** उन्हाळ्याच्या हंगामात हा व्यवसाय चांगला चालणार आहे कारण लोकांना कडक उन्हात सतत काहीतरी थंड घेणे आवडते, मग सोडा व्यवसाय सुरू करणे खूप फायदेशीर ठरू शकते. लक्षात ठेवा की आपण महाविद्यालयीन शाळेच्या आसपास सोडा व्यवसाय सुरू करावा कारण तरुणांना सोडा पिणे अधिक आवडते. या ठिकाणी सोडा व्यवसाय करून तुम्ही दर महिन्याला चांगली कमाई करू शकता.

**2. नाश्त्याचे दुकान :** सध्याच्या धावपळीच्या जीवनात लोकांना नाश्त्यासाठी वेळ मिळणेही कठीण झाले आहे. बहुतेक लोक घरून निघाल्यानंतर वाटेत नाश्ता करतात. तुम्ही सुद्धा फराळाचे दुकान उघडले आणि जोपर्यंत तुम्ही ग्राहकांना चांगले जेवण देत राहिलो, तर या व्यवसायात ग्राहकांची कमतरता भासणार नाही आणि तुमचा व्यवसाय कधीही तोट्यात जाणार नाही कारण प्रत्येकाला चांगले जेवण आवडते. जर तुम्ही कॉलनी रोडच्या चौकाचौकाजवळ नाश्त्याचे दुकान उघडले तर तुम्हाला चांगला नफा मिळू शकतो.

**3. हस्तनिर्मित वस्तूंचा व्यवसाय –**
हल्ली हाताने बनवलेल्या वस्तूंचा ट्रेंड पुन्हा जोर धरू लागला आहे. तरीही लोक हँड क्राफ्टच्या वस्तूंना अधिक पसंती देतात. तुम्ही अनेकदा पाहिलं असेल की पंतप्रधान नरेंद्र मोदी देखील स्थानिक खाद्यपदार्थांबद्दल बोलतात. तुमच्याकडेही अशी काही कला असेल तर तुम्ही नक्कीच हा व्यवसाय सुरू करू शकता. जसे की लाकडी भांडी बनवणे, मातीची भांडी बनवणे, रंगकाम करणे, संगमरवरी मूर्ती बनवणे, विणकाम करणे इत्यादी गोष्टींमधूनही तुम्ही भरपूर पैसे कमवू शकता.

**4. आईस्क्रीम व्यवसाय –**
आइस्क्रीमचा व्यवसाय सुरू करण्यासाठी तुम्ही उच्च शिक्षित असण्याची आणि तेवढी भांडवल गुंतवण्याची गरज नाही. आपण इच्छित असल्यास, आपण लहान प्रमाणातआईस्क्रीम बनवण्याचा व्यवसाय सुरू करू शकता. उन्हाळ्यात आईस्क्रीमची मागणी मोठ्या प्रमाणात वाढते. मुलांमध्ये आईस्क्रीमला नेहमीच मागणी असते.

**5. अगरबत्तीचा व्यवसाय :** अगरबत्ती ही एक अशी वस्तू आहे ज्याचा वापर कधीच संपू शकत नाही, कोणत्याही भाविकाला ती थांबवता येत नाही, त्यामुळे तुम्हीही सुगंधित अगरबत्तीचा व्यवसाय तुमच्या घरून सुरू करू शकता, कच्चा माल आणून घरून अगरबत्ती बनवून तुम्ही स्वतः पाठवू शकता. किंवा दुकानदाराला विकून पैसे कमवू शकता.

**6. मेणबत्ती बनवण्याचा व्यवसाय –**
मेणबत्त्या देखील सर्वत्र वापरल्या जातात, शहरातील बहुतेक लोक घर सजवण्यासाठी मेणबत्तीचा व्यवसाय करतात आणि खेडेगावात दिवा लावण्यासाठी देखील याचा वापर केला जातो, त्यामुळे तुम्ही हा व्यवसाय कुठेही केलात तर तुम्हाला चांगली कमाई करता येते. तुम्ही तुमच्या घरी दिवे लावण्याचे काम सुरू करू शकता. यासाठी तुम्हाला जास्त पैशांची गरज भासणार नाही. मेणबत्ती सध्या एक ट्रेंडिंग व्यवसाय आहे हॉटेल्स किंवा सजावटी साठी सुद्धा खूप वापर केला जातो.

**7. बिस्किट बनवण्याचा व्यवसाय –**
लोक बाजारात विकली जाणारी बिस्किटे किंवा कुकीज विकत घेतात, परंतु बऱ्याच वेळा लोकांना हाताने बनवलेल्या कुकीजचे विविध प्रकार चाखायचे असतात. याशिवाय, जर तुम्हाला आता कुकीज बनवायची असतील तर तुम्ही हा व्यवसाय सुरू करू शकता. बिस्कीट व्यवसायात खूप चांगली कमाई आहे. तुम्ही एकदा का हा व्यवसाय चालू केला कि तुम्ही तुमचा व्यवसायात नक्कीच यशस्वी होणार. बिस्कीट बनवण्याचा व्यवसायाबद्दल संपूर्ण माहिती – बिस्कीट बनवण्याचा व्यवसाय कसा करावा

**8. पेपर प्लेट बनवण्याचा व्यवसाय –**
आजकाल बहुतेक लोक लग्न, वाढदिवस किंवा पिकनिक मध्ये पेपर प्लेट्स वापरतात, त्यामुळे तुम्ही देखील कमी खर्चात हा व्यवसाय सुरू करण्याचा नक्कीच विचार करू शकता आणि चांगले उत्पन्न मिळवू शकता. तुम्हाला हवे असल्यास तुम्ही कागदी प्लेट्स स्वतः बनवून पाठवू शकता. याशिवाय , तुम्ही कोणत्याही दुकानात तुमचे वस्तू विकून पैसे कमवू शकता.

**9. पाणीपुरीचा व्यवसाय :** पाणीपुरी व्यवसाय हा खूप लोकप्रिय आणि खूप जास्त चालणार व्यवसाय आहे. या व्यवसायाला भांडवल देखील खूप कमी लागते, कमी भांडवल मध्ये खूप चांगला व्यवसाय आहे. पाणीपुरी चा व्यवसाय तुम्ही कुठूनहि चालू करू शकतात, कारण पाणीपुरी प्रेमी तुमच्या पर्यंत स्वतःहून येणार, तुम्ही जर कॉलेज, थेटर, बाजारात अश्या गर्दीच्या ठिकाणी जर व्यवसाय चालू केलात तर तुम्ही हजारो रुपये सहज कमवू शकतात.

**10. मसाल्याचा व्यवसाय :** जर तुम्ही शेतकरी असाल आणि तुम्हाला शेतीशी जोडून कमी खर्चात व्यवसाय सुरू करायचा असेल तर तुम्ही मसाल्याचा व्यवसाय करू शकता. जर तुम्हाला स्वतः मसाले पिकवायचे असतील तर तुम्ही मसाले विकू शकता. हा व्यवसाय थोड्या प्रमाणात करूनही तुम्ही चांगले पैसे कमवू शकता. प्रत्येक पदार्थाची चव त्यात वापरल्या जाणाऱ्या मसाल्यांवर अवलंबून असते आणि लोकांना स्वादिष्ट पदार्थ खायला आवडतात. मग तुम्हाला तुमच्या मसाल्याचा व्यवसाय मोठ्या प्रमाणावर करायचा असेल, तर तुम्ही स्टँडिंग मसाला किंवा पावडर बनवूनही तुमच्या मसाल्याला बाजारात ब्रँड नाव देऊन विकू शकतात. तुम्हाला व्यवसाय समन्धीत कोणतीही माहिती लागली तर तुम्हाला आमच्या businessideasmarathi वर संपूर्ण माहिती मिळेल.

# तरुणांनो धार्मिक दंगलीपासून दूर रहा



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**महाराष्ट्र पुरोगामी विचाराचे राज्य आहे. महाराष्ट्राच्या या भुमीमधुन समता, बंधुता, न्याय, व स्वातंत्र्याची शिकवण देशातच नव्हे तर जगाच्या काण्याकोपऱ्यात गेली आहे. परंतु समतावादी व धर्मनिरपेक्ष विचाराची पेरणी होऊ नाही याची खबरदारी येथील मनुवादी लोकांनी सुरवाती पासून घेतली आहे. धर्मनिरपेक्ष व कार्यसापेक्ष विचाराचा प्रचार आणि प्रसार करून देशात शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्याचे काम सरकारचे आहे. परंतु सरकारच धर्मांध असल्याने केवळ धर्माच्या नावाच्या नावावर फुट पाडून लोकांच्या मुळ समस्या न सोडवता धार्मिक समस्येला प्राधान्य देऊन लोकांना अडचणीत आणण्याचे काम अनेक दिवसांपासून येथे सुरू आहे. देशात कोणताही धर्म धोक्यात नाही. धोक्यात व संकटात आहेत ते भारतीय नागरिक.**

कोणत्याही एखाद्या चुकिच्या पोस्ट वरून, एखादा व्यक्ती च्या चुकिच्या वक्तव्यावरुन, वा चुकिच्या लोकांचे नाव घेऊन कधीच कोणताही धर्म संकटात येत नाही. जर एखाद्या पोस्ट वरून धर्म धोक्यात येत असेल तर तो धर्म एवढा कमकुवत आहे का? असा साधा प्रश्न स्वतः च्या मनाला विचारने आवश्यक आहे. समता, बंधुता, न्यायाची शिवकण देऊन देशात सामाजिक क्रांती करून विषमतावादी व्यवस्था गाडून सर्वसामान्य मानसांच्या कल्याणाचे राज्य निर्माण करणाऱ्या शाहु महाराजांच्या कोल्हापूर मध्ये धार्मिक दंगल होते आणि ती ही एका स्टेटस वरून हि खुपच चिंताजनक बाब आहे. वाईट प्रवृत्तीचे, कृत्याचे कोणीही समर्थन करत नाही तरीही धार्मिक दंगली का घडतात याचा विचार करणे आवश्यक आहे. मागील काही दिवसापासून राज्यात औरंगाबाद, नाशिक, अकोला, कोल्हापूर अशा अनेक ठिकाणी धार्मिक दंगली निर्माण झाल्या. मुळात प्रश्न हा आहे गृहखात्याकडे सर्व काही अद्यावत यंत्रणा आहे, मनुष्यबळ आहे, अधिकार आहे तरीही धार्मिक दंगली होतात यातून दोन निष्कर्ष निघतात एक म्हणजे सरकार धार्मिक दंगली नियंत्रीत करण्यासाठी अपयशी ठरत आहे किंवा दुसरा निष्कर्ष सरकारच धार्मिक दंगली घडवत आहे. सर्व यंत्रणा असताना दंगली होतातच कशा हाच खुप मोठा प्रश्न आहे. दंगली बाबत दुसरे महत्वाचे निरीक्षण असे आहे की कोणतीही दंगल राजकीय हस्तक्षेपा शिवाय होत नाही हेही तेवढेच खरे आहे. समाजा मधून, गावामधून किंवा दोन समुहामधून दंगल कधीच निर्माण होत नाही. याचा अर्थ गावात, गल्लीत राहताना सर्व जन आनंदाने व एकीने राहतात. परंतु धर्माच्या नावावर राजकीय हित जोपासणारे लोक धार्मिक तेढ निर्माण होईल असे वक्तव्य करतात, धर्मधोक्यात आहे म्हणून बोलतात व लोकांना धर्म विषयक भावनिक बनवतात. दुसरा मुळ मुद्दा असा आहे की लोकांना कधीच कळत नाही का धर्म धोक्यात आहे म्हणून? प्रत्येक वेळी राजकीय नेतेच का धार्मिक तेढ निर्माण होण्याचे बोलतात? सर्व सामान्य तरुणांच्या मनामध्ये धार्मिक भावना भरून त्यांना त्यांना भावनिक केले जाते व भावनिक लोकांचा वापर दंगली मध्ये केला जातो. दंगली मध्ये अनेक गुन्हे दाखल होतात. गुन्हे दाखल झाले की शिक्षण व नोकरी मिळत नाही, कोर्टकचेरी मध्ये तरुण त्रस्त होतात. आयुष्य उद्ध्वस्त होते. आज पर्यंत ज्या काही धार्मिक दंगली राज्यात झाल्या आणि ज्या तरुणांवर गुन्हे दाखल झाले, तुरुंगात गेले अशा तरुणांच्या कुटुंबाला एका तरी राजकीय नेत्यांनी आर्थिक मदत वा कोर्टाचा खर्च उचलला का? जे लोक सांगतात धर्म धोक्यात आहेत, सर्वांनी एकत्र यावे, धर्मविरोधी कृत्य सहन केले जाणार नाही, असे भडकाऊ वक्तव्य करून तरुणांच्या डोक्यात द्वेष पेरणारे नेते, त्यांचे मुले, त्यांचे जवळचे नातेवाईक धर्माच्या संरक्षणासाठी प्रत्यक्ष दंगली मध्ये का उतरत नाही. ज्यांना वाटते धर्म धोक्यात आहे आणि दंगल घडवली जाते त्यावेळी धर्माचे गर्व असलेले लोक व नेते दंगलीची जबाबदारी स्वतः वर घेऊन बाकीच्या तरुणांना शिक्षण नोकरी व भविष्यासाठी निर्दोष सोडा त्यांचा यामध्ये काही ही सहभाग नाही. दंगल आम्ही ठराविक लोकांनी धर्माच्या संरक्षणा साठी घडवून आणली असे बोलून समोर का येत नाहीत? दंगली घडेपर्यंत धर्म धोक्यात वाटणाऱ्यांना गुन्हे स्वतः च्या नावावर घेताना, धर्मातील निर्दोष तरुणांवर गुन्हे दाखल होताना धर्म व धर्माचे तरुण धोक्यात दिसत नाहीत का? असे अनेक प्रश्न उपस्थित होतात. राजकीय नेते, धार्मिक तेढ निर्माण होईल असे बोलणारे, धर्म धोक्यात आहे असे बोलणाऱ्या लोकांवर गुन्हे दाखल व्हायला पाहिजे पण न होता सर्वसामान्य तरुणांवर गुन्हे दाखल होऊन त्यांचे जिवन विस्कळीत करून ठेवले जाते. कोल्हापूर च नव्हे तर आजपर्यंत जेथे जेथे धार्मिक दंगली झाल्या त्या दंगली मध्ये सर्व सामान्य तरुणांवर जे गुन्हे दाखल झाले, त्यांच्या जमानतीसाठी किती राजकीय नेते व धर्माचे ठेकेदार समोर आले? धार्मिक दंगली मध्ये गुन्हे दाखल झाल्याने नोकरी न करता येणाऱ्या किती तरूणांना राजकीय नेते व धर्माच्या ठेकेदारांनी आर्थिक मदत करून त्यांची भरभराट केली. दंगल घडल्यानंतर स्वतः च्या मुलांच्या जमानतीसाठी काय काय करावे लागते हे दंगल ग्रस्त भागात जाऊन तरुणांच्या कुटुंबातील सदस्यांना विचारा. जेव्हा तरुणांना खऱ्या अर्थाने धर्मातील लोकांची, राजकीय नेत्यांची गरज असते तेव्हा सर्वच गायब होतात. यावरून हेच लक्षात येते की धर्माचा गर्व व धर्म संकट केवळ राजकीय पोळी भाजण्यासाठी आहे. सर्व सामान्य लोकांना धर्माचा काही फायदा होतो का? राजकीय नेते पाच वर्ष जनविकास न करता केवळ जनतेचा पैसा स्वतः च्या खिशात ओढतात आणि करोडो रुपयांचा भ्रष्टाचार करतात. निवडणूकीच्या वेळी मत माघायला व मताचे विभाजन करायला काही मुद्दे पाहिजे म्हणून निवडणूक



पुर्व असे घटना घडतच राहतात. परंतु तरुणांनी जागृत होऊन जनहिताच्या व देशहिताच्या कोणत्या गोष्टी आहेत त्यावर लक्ष देऊन सरकार ला त्याच बाबींवर धारेवर धरून प्रश्न विचारून जनहित लक्षात घेतले पाहिजे. धर्म मानसा साठी असतो. धर्मासाठी माणूस नसतो हि गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे. अनेक दंगली मध्ये लाखों तरुणांचे आयुष्य उद्ध्वस्त होते परंतु राजकीय नेत्यांची मुल त्यात का नसतात. राजकीय नेत्यांना धर्म नसतो? तरुणांनी शिक्षण, रोजगार, आरोग्य सुविधा, महागाई, समता, बंधुता, न्याय, देश हित यावर केंद्रीत करणे आवश्यक आहे. कोणत्याही गुन्हेगारांना धर्म व जात नसते, आणि प्रत्येक धर्मात गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक असतात म्हणून गुन्हेगाराला शिक्षा हि गुन्हा बघुन द्यायला पाहिजे जात धर्म बघुन नाही. तरुणांनी धार्मिक न होता केवळ धर्माचा गर्व करून धर्माच्या नावाखाली चुकिच्या गोष्टीचा स्विकार न करता भारतीय म्हणून देशाचा गर्व करावा आणि वैज्ञानिक दृष्टिकोन समोर ठेवून संशोधनाला महत्त्व द्यावे. एक संशोधन तरुणांना मान सन्मान पद प्रतिष्ठा देते स्वतः सोबत परिवाराचा गौरव होतो. याऊलट एक दंगल त्याच तरुणांचे आयुष्य नष्ट करू शकते. कोणताही धर्म विषमता वा द्वेष करायला शिकवत नाही. कोणत्याही धर्मात विषमता नाही मग द्वेषाची आणि विषमतेची भाषा कोण करते तर ज्यांना मनुस्मृती मान्य आहे आणि ज्यांना आजही मनुस्मृती चे राज्य पाहिजे असेच लोक विषमता व द्वेषाची भाषा करून तरुणांना धार्मिक व कट्टर बनवून शिक्षण नोकरी पासून दुर ठेवण्याचा प्रयत्न करतात. एकदा तरी शिव फुले शाहु आंबेडकर आणि संत तुकाराम महाराज, संत नामदेव महाराज, संत सावतामाळी, संत रोहिदास महाराज, संत सेवालाल महाराज, संत गाडगेबाबा सर्वच मानवतावादी संताचे विचार व कार्य वाचा म्हणजे देशाची व समाजाची सत्य परिस्थिती कळेल. तरुणांना शिक्षणाची द्वारे उघडून चिकित्सा व संशोधनाच्या माध्यमातून गुणवान बनवण्या ऐवजी धार्मिक बनवून दंगलखोर बनवले जात आहे. हिच खुप मोठी शोकांतिका आहे. तरुणांनी दंगलीकडे वळून आयुष्य उद्ध्वस्त न करता शिक्षणाच्या माध्यमातून आपली वैचारिक व आर्थिक श्रीमंती वाढवून स्वतः ला व देशाला मजबूत करण्याचे काम करावे. दंगल घडवून मताचे राजकारण करणाऱ्यांना आणि धर्माच्या नावाखाली तरुणांना जेल मध्ये पाठवून मतासाठी सर्वांच्या दारी जाणाऱ्या विषमतावादी नेत्यांना तरुणांनी एकत्र येऊन धडा शिवकवणे आवश्यक आहे. तरुणांनो जागृत होऊन स्वहित व देशहित बघा स्वतः चे हित झाले तर धर्माचेही होतेच. परंतु धर्माचे हित करण्याच्या नादात स्वतः चे भविष्य उद्ध्वस्त करू नका.

# नाना जातिधर्मांच्या लोकांचा वारीत सहभाग!



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**आषाढी एकादशीसाठी पंढरपूर येथे जाणारी वारकरी पदयात्रा होय. वारकरी भक्तांनी आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरपर्यंत केलेली पदयात्रा होय. वारकरी संप्रदाय म्हणजे पंढरपूर येथील विठ्ठलाच्या वारीला जाणाऱ्या लोकांचा संप्रदाय होय. या संप्रदायाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे आषाढी वारी. या वारीमध्ये अनेक जाति-धर्मांचे लोक मराठा, सोनार, कुंभार, चांभार, माळी, महार, कुणबी, न्हावी, लिंगायत व इतर जातींचे भाविक भक्त सुद्धा जास्तीत जास्त संख्येने सहभागी होतात. वारी हा एक आनंद सोहळा असतो. वारी म्हणजे महाराष्ट्रातील विविध गावांपासून सुरू होऊन पंढरपूर येथे संपणारी सामुदायिक एक पदयात्रा होय.**

वारी ही महाराष्ट्रातील एक धार्मिक व सांस्कृतिक परंपरा आहे. ही वारी आषाढ आणि कार्तिक महिन्यातील शुद्ध एकादशी अशा दोन्ही वेळी होते. आळंदी येथून संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पादुका आणि देहू येथून संत तुकाराम महाराजांच्या पादुका पालखीत ठेवून ती पालखी रथातून पंढरपूर येथे मार्गस्थ होते. संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत तुकाराम हे वारकरी संप्रदायातील महत्त्वाचे संत होत. वारकरी संप्रदायात लहान मोठा हा भेद नाही. संतोक्ती साक्ष देते-

**"पंढरीच्या लोका नाही अभिमान!**
**पाया पडती एकमेका होऊनी लहान!!"**

वारी करणाऱ्या व्यक्तीस वारकरी म्हणतात. भगवान विष्णूंचा अवतार असलेल्या पांडुरंगाचे-विठ्ठलाचे हे भक्त असतात. आपले कर्तव्यकर्म निष्ठेने करीत असता ते भगवंताचे विस्मरण होऊ देऊ नये यासाठी गळ्यात तुळशीची माळ घालतात. या माळेच्या जपमाळ म्हणून उपयोगाशिवाय, ती गळ्यात घातल्याविना वारकरी होता येत नाही, असे वारकरी पंथ सांगतो. स्नान करून भाळी गोपीचंदनाचा टिळा लावावा. नित्यनेमाने हरिपाठ म्हणावा. संतांचे ग्रंथ वाचावेत. देवाच्या मूर्तीचे दर्शन घ्यावे. भजन-कीर्तनात सहभाग घ्यावा. पंढरपूरवारी करावी तसेच एकादशीव्रत करावे. वारकऱ्याने पंढरपूरमध्ये सात्त्विक आहार व सत्त्वाचरण करावे. परोपकार आणि परमार्थही करावा. जीवनातील बंधनातून, मोहातून हळूहळू बाजूस होऊन पांडुरंगाशी एकरूप व्हावे, नामस्मरण करावे, असा साधा आणि उघड परमार्थ वारकरी संप्रदायाने सांगितला आहे. नामजपाने पुण्य मिळते हा भाव आहे. एकादशी आणि इतर पवित्र दिवशी नित्यनेमाने पंढरपूरला जाणे म्हणजेच वारी होय. जो नियमित वारी करतो तो वारकरी असतो. वारकरी जो धर्म पाळतात त्याला वारकरी धर्म असे म्हणतात. वारकरी धर्मालाच भागवत धर्म म्हटले जाते-

**"पंढरीचा वास, चंद्रभागेस्नान!**
**आणिक दर्शन विठोबाचे!!"**

या इच्छेपोटी वारकरी वारी चुकवत नाहीत, अशी भागवत संप्रदायाची धारणा आहे. त्यामुळेच आषाढी वारी ही प्रत्येक वारकरी महिलापुरुषांच्या मनात आदराचे आणि श्रद्धेचे स्थान बाळगून आहे, असे मानले जाते.

वारकरी महावाक्य- वारकरी धर्मात कोणत्याही कार्याची सुरुवात करताना- "पुंडलिक वरदा हरी विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम, पंढरीनाथ महाराज की जयऽऽऽ!" असा जयघोष केला जातो. स्थानपरत्वे या जयघोषात पंढरीनाथ भगवान की जय, असाही भेद आढळतो. अनेक ठिकाणी माउली ज्ञानेश्वर महाराज की जय, जगद्‌गुरू तुकाराम महाराज की जय, शान्तिब्रह्म एकनाथ महाराज की जय अशीही विविधता आढळते. या जयघोषाला वारकरी महावाक्य किंवा वारकरी महाघोष म्हटले जाते. पायी केल्या जाणाऱ्या पंढरीच्या वारीची परंपरा बरीच जुनी आहे. तेराव्या शतकात ही परंपरा असल्याचे उल्लेख सापडतात. संतश्रेष्ठ ज्ञानदेवांच्या घराण्यात पंढरीच्या वारीची परंपरा होती. त्यांचे वडील वारीला जात असल्याचा उल्लेख आढळतो. ज्ञानदेवांनी भागवत धर्माची पताका खांद्यावर घेऊन सर्व जातीपातींच्या समाजाला एकत्रितपणे या सोहळ्यात सामील करून घेतले. हेच व्यापक स्वरूप जपत पुढे संत एकनाथ महाराज, जगद्‌गुरू संत तुकाराम महाराज, संत मल्लप्पा वासकर यांसारख्या संतांनी वारीची परंपरा चालवली. संत तुकाराम महाराज यांच्याही कुटुंबात वारीची परंपरा होती. संत साहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे म्हणतात- "पंढरपूरची वारी हा वारकरी संप्रदायाचा मुख्य आचारधर्म होय. वारी ही ज्ञानदेव पूर्वकालीन प्रथा आहे, किंबहुना वारकरी हे नावच वारीमुळे पडले आहे. वारीतून या संप्रदायाची सामाजिकता आणि समाजाभिमुखता स्पष्ट होते. वारीची परंपरा सर्व संतांनी जतन केली आहे." ज्ञानदेवांच्या कर्तृत्वामुळे हा संप्रदाय जनमानसावर प्रभाव गाजवून महाराष्ट्रव्यापी झाला; परंतु संप्रदायाचा आद्य प्रवर्तक ठरतो भक्त पुंडलिकच! भक्त पुंडलिकापासून या संप्रदायाला इतिहासाला सुरुवात होते. या इतिहासाचे पुढील कालखंडांत विभाजन असे करता येईल- ज्ञानदेवपूर्व काळ- भक्त पुंडलिकाचा काळ, ज्ञानदेव-नामदेव काळ, भानुदास-एकनाथांचा काळ, तुकोबा-निळोबांचा काळ, तुकारामोत्तर तीनशे वर्षांचा काळ. म्हणून वारकरी पंढरीमहिमा गात गात जातात-

**"जाता पंढरीशी सुख वाटे जीवा।**
**आनंदे केशवा भेटताचि।।**
**या सुखाची उपमा नाही त्रिभुवनी।**
**पाहिली शोधोनि अवघी तीर्थे।।**
**सेना म्हणे खुण सांडी सांडी संती।**
**यापरती विश्रांती न मिळे जीवा।।**
**विठ्ठल विठ्ठल विठ्ठला,**
**हरि ओम विठलाऽऽऽ...।।"**

वारीच्या परंपरेची माहिती मुलांना विशेषतः पुढील पिढ्यांना होण्यासाठी बालगटाच्या शाळा ते माध्यमिक शाळा यांमध्ये आषाढी एकादशीच्या आधी वारीचे आयोजन केले जाते. विद्यार्थी-विद्यार्थिनी वारकरी पोशाख घालून येतात आणि पालखी सजवून त्यात विठ्ठल-रखुमाई यांची पूजा करून पालखी सोहळा साजरा करतात. शहरातील निवडक माध्यमिक शाळांतील मुले प्रत्यक्ष वारीमध्ये सहभागी होतात आणि वारकरी भक्तांशी संवाद साधतात, ठरावीक अंतर पायी चालून वारीचा अनुभव घेतात.

सायकल वारी- वारीतील विविध सुविधांची पाहणी करण्यासाठी २००० युवक सायकल वारी करतील अशी योजना २०१७ साली करण्यात आली. वारीतील गर्दीमुळे होणारी अस्वच्छता दूर करण्यासाठी वारीनंतर पंढरपुरात तसेच वारीमार्गावर स्वच्छता अभियान राबविले जाते. पंढरपूरला जात असलेल्या वारकरी समुदायाची सेवा करण्याची संधी समाजाच्या विविध स्तरातून घेतली जाते. काही मंडळी वैयक्तिक किंवा कौटुंबिक स्तरावर अशी सेवा पुरवितात. ज्यामध्ये वारीच्या मार्गावर उभे राहून वारकऱ्यांना खाद्यपदार्थ पुरविणे, पाण्याची व्यवस्था, कपडे, वर्षावस्त्र देणे, अशी सेवा केली जाते. सामाजिक संस्था, औद्योगिक संस्था या सुद्धा त्यांना विविध सुविधा पुरवितात. यामध्ये त्यांची सेवा करणे एवढाच भाव नाही तर त्यांच्या रुपातील विठ्ठल परब्रह्माला पुजणे, असा भाव असतो. काही वैद्यकीय संस्था आणि रुग्णालये वारकरी भक्तांची शारीरिक चाचणी, आरोग्य व उपचार यांची काळजी घेतात. वारीसाठी भक्तांना वाहनांची सुविधा देण्यात येते. यासाठी शासकीय स्तरावर योजना राबविल्या जातात. पालकी मार्गाची पाहणी करणे, रस्त्यांची स्वछता, वैद्यकीय सेवा, पिण्याचे पाणी यांची व्यवस्था महाराष्ट्र शासनातर्फे केली जाते. चला, आपणही सुरात सूर मिसळत गाऊ-

**"विठ्ठल विठ्ठल विठ्ठला,**
**विठ्ठल विठ्ठल विठ्ठलाऽऽऽ...।**
**का गा ना येशी विठ्ठला।**
**ऐसा कोण दोष मला।।**
**दीनानाथ दीनबंधू।**
**जनी म्हणे कृपासिंधू।।"**

वारी सगळ्यांनाच माहीत आहे. मात्र परतवारी माहीत असणारे आणि ती करणारे लोक खूप कमी आहेत. वारी करताना जागोजागी पावलापावलांवर दानशूर लोक सोयी सुविधा उपलब्ध करून देतात. मात्र परतवारीच्या वेळी अतिशय कष्टप्रद प्रवास करावा लागतो. वारीला ग्लॅमर आहे, तर परतवारीला लाट ओसरून गेल्यानंतरचं उदासवाणे वातावरण बघावयास मिळते. परतवारीलाही वरीलप्रमाणे सर्व सोयी सुविधा व आरोग्य सेवा उपलब्ध व्हाव्यात अशी याद्वारे एक रास्त व माफक अपेक्षा!


!! पंढरपूर आषाढ वारी व जत्रेच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

# लाडझरीच्या वैभवात भर घालणारा कृषिपरक उद्योगी, आधुनिक तंत्रज्ञान पारंगत, बालकथाकार, तरल जाणिवेचा कवी : रमेश मोटे !

## संयमाचा परीघ



चित्र : बाबूराव पाटील, भोकर



प्रा. डॉ.मुकुंद राजपंखे
संपर्क क्र. 9881294226

भाग : ३०

आधुनिक केसरी

**(लाडझरी ता.अंबाजोगाईची अवघ्या महाराष्ट्रभर ओळख निर्माण करणाऱ्या चार-पाच तरुणांशी माझा आजवर मनस्वी जिव्हाळा राहिलेला आहे. पत्रकार बंधू वसंत मुंडे आज महाराष्ट्राच्या पत्रकारांचे तरुण तडफदार नेते आहेत. दयानंद कांबळे हे लढाऊ सामाजिक चळवळ लसाकमची आपल्या वक्तृत्वानं धडाडणारी तोफ असून लोकप्रिय शिक्षक आमदार विक्रमबप्पा काळे साहेबांचे खंदे पाठीराखे आहेत.लातूर जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस शिक्षक संघाचे अध्यक्ष आहेत.बालासाहेब शेप आणि त्यांच्या मंडळी कर्तव्यदक्ष तलाठी आहेत.आषिश कांबळे सोलापूरकडं इंग्रजी विषयाचे प्राध्यापक आहेत.रामकिशन चाटे शिक्षक आहेत आणि रमेश मोटे हा धडपड्या तरुण आपल्या साहित्य आणि अध्यात्मिक उपक्रमांसह अधुनिक शेती आणि तंत्रउद्योगात आपला झेंडा फडकुन आहे. बोटावर मोजता येतील इतक्या या पाच सहा माणसांनी लाडझरीची सभ्य सुसंस्कृत लोक-संस्कृती जगासमोर ठेवली आहे ती त्यांच्या अंगी असलेल्या साहित्यिक, शैक्षणिक, वृत्तपत्रीय, अध्यात्मिक आणि सांस्कृतीक कार्यामुळं. यातील अशिष, बालासाहेब आणि रामकिशन हे थेट आमच्या यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागाचा अभिमान आहेत,शान आहेत आणि रमेश मोटे या तीनही विद्यार्थ्यांचे जिव्हाळ्याचे बालमित्र, त्यामुळं कायम आमच्या सृजनशील, संवेदनशील वर्तुळात आपल्या विनयशील स्वभावामुळं साहित्यिक, सांस्कृतिक कलागुणांनी बहरत राहिले, नावारुपाला आले.चला तर मग आज आपण 'संयमीचा परीघ' या सदरात संवेदनशील, संयमी कवी, बालकथाकार, कृषीपूरक उद्योगी तरुण, अधुनिक संगणकीय तंत्रज्ञान पारांगत अशा अभूषनी नटलेल्या रमेश मोटे या साहित्यिकाची सखोल ओळख करुन घेऊयात. कसलीच सरकारी नौकरी नसलेला परंतू आला दिवस आनंदीनं जगणीरा हा तरुण 'आमचं कसं व्हावं ?' म्हणून आवसान गाळून बसलेल्या तरुणांसाठी आदर्श आहे.)**

सृजनशील सद्गुणी तरुण रमेश मोटे :
 रमेश मोटे यांना आपण कवी कथाकार घाटनांदुरचे टायपिंग संस्थाचालक, रानावर जीव असलेला अधुनिक शेतकरी आणि कौटुंबिक जिव्हाळ्यात, गणगोतात जबाबदारीनं वागणारा तरुण म्हणून २००८ पासून ओळखतो ! या तरुणाचे दोन कविता संग्रह प्रकाशीत झालेत.पहिला 'राना मनातल्या कविता' २०१५ ला माझ्या प्रस्तावनेसह गावात आनंदात समारंभपुर्वक प्रकाशीत झाला तर दुसरा 'ग्रामिण मातीचा काव्यसुगंध' प्रा.नरसिंग उदार यांच्या प्रस्तावनेसह प्रकाशीत झाला. दै.दिव्य मराठीच्या 'किड्स कॉर्नर' मधून बालकथांचं लेखण करतात. मगील दहा पंधरा वर्षापासून साहित्याचा छंद जडला, त्याचं सोनं केलं आहे. रमेशला पखवाज फार छान वाजवता येतो आणि तो किर्तनातुन मनस्वी साथही करतो. गावातल्या अध्यात्मिक परिवारात आदरणीय वावर आहे.पाटावर बसून, चौरंगावर धार्मिक पुस्तक ठेवून रसाळ वाणीनं पारायणंही केली आहेत परिसरात आणि कंबर बांधून किर्तनंही केले आहेत ह.भ.प. म्हणून. तुकोबाची गाथा, ज्ञानोबाच्या ज्ञानेश्ववरीसह तुकडोजींच्या ग्रामगीतेशीही हा तरुण तितकाच जवळून परिचीत आहे. घाटनांदूरच्या वृद्धाश्रमातील ग्रामगीतेचा संस्कारही सखोल मुरला आहे अंतःकरणावर. कधीमधी चित्रकलेतही जीव रमतो. या सगळ्यांचा मिळून एक छान परीनाम रमेशच्या समग्र आयुष्यावर झालेला असल्याने लिनता, सत्शिलता, सुसंवाद आणि समन्वय ही मूल्ये व्यक्तीमत्वात रुजली आहेत.

**शेतीपूरक उद्योग आणि तंत्रज्ञानात मुरलेला तरुण रमेश मोटे :** लाडझरी गावातील विकासाची भूमीका घेऊन चालणा-या तरुण पिढीच्या हातात हात घालून रमेश आणि त्याचे एकजिवाचे सन्मित्र असतात ही अजून जमेची अर्थात आनंदाचीच बाब.सहकार, समन्वय आणि संयमी सुसंवाद ही महत्वाची मूल्यव्यवस्था रमेशच्या ठायी आहे, त्यामुळं फार कमी वयात त्यानं मोठं शहानपण कमावलं आहे. घराच्या पातळीवर भावंडांना धरुन असतो आणि भावंडांच्या विचारात एकात्मता असल्यामुळं अधिकारवाणीने निर्णय घेऊन कुटुंबाच्या विकासाचं काटेकोर नियोजन रमेशला आजवर करता आलं आहे आणि इथून पुढंही तो करत राहील या बद्दल मला यत्किंचीतही शंका नाही. लाडझरी, घाटनांदूर, धर्मापुरी परिसरातील ह.भ.प. परीवार असो,साहित्यिकांचा परिवार असो, दूध संकलन यंत्रणा असो नाही तर घाटनांदूर येथील 'शिवनेरी कॉम्प्युटर टायपिंग इन्स्टीट्युट' चालवणं असो, अशा सगळ्या क्षेत्रात जीव लाऊन काम करणारा हा कर्तबगार तरुण आहे.

**घाटनांदूर परीसरातलं साहित्यिक वर्तूळातला संवेदनशील व्यक्ती रमेश मोटे :** घाटनांदूर परीसरात सहित्याची मुळं खोलवर रुजवणा-या बोटावर मोजता येतील येवढ्या मोजक्या माणसांमधे रमेश मोटे यांचा समावेश होतो.आरंभीच्या काळात दौंडवाडीचे कै. वामन जयवीर गुरुजी, सन्मित्र प्राचार्य आणि प्रकाशक श्रावण गिरी, कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक दि ना. फड, बालसाहित्यिक नागनाथ बडे नाना, कवी, कथाकार आणि फोटोग्राफर दत्ता वालेकर, कथाकार प्रा. नरसिंग उदार, कवी सत्तू जाधव, लाडझरीचे विद्यार्थीप्रिय शिक्षक दयानंद कांबळे, पट्टीवडगावचे कवी परमेश्वर वाकडे, उत्तम सूत्रसंवादक प्रा. मकरंद जोगदंड, आणि आता अजून तीन नावांची नोंद होते आहे ती कविवर्य डॉ.संजय खाडप, लाडझरीचे प्रा.अशिष कांबळे तथा बालकथाकार रमेश मोटे यांची.मुळात असलेली माणुसकी आणि संवेदनशील मनाने बहरलेली कविता घेऊन हे तरुण घाटनांदूर परिसराचा नावलौकिक वाढवत आहेत.यातील श्रावण गिरी हे थेट आमच्या एम ए इंग्रजी विभागाचे हुशार विद्यार्थी आणि दि.ना फड यांचं कला शाखेतील पदवी पर्यंतचं शिक्षण आमच्या यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात झालेलं आहे, ही विषेश आनंददायी नोंद.

**लाडझरीचा कवी रमेश मोटे :** यांची कविता, कथा आणि अध्यात्मिक कार्य भवतालाच्या नजरेतून सुटलेलं नाही. वेळोवेळी साहित्य संमेलने, कविसंमेलने, साहित्याच्या उत्सवांनी सन्मानीत केले गेले आहे. मागील वर्षी रमेश मोटे यांना राज्यस्तरीय यशवंतरत्न पुरस्कार प्राप्त झाला आहे. जय मल्हार सामाजिक प्रतिष्ठाणच्या वतीने थाटामाटात बीड येथील कार्यक्रमात त्यांच्या काव्यप्रतिभेचा गौरव करण्यात आला ही मोठी आनंदाची गोष्ट आहे.तर या अशा आनंदी पार्श्वभूमीवर आजच्या 'संयमाचा परीघ' या साप्ताहिक सदरात लाडझरीचे कवी तथा बालकथाकार यांची 'गाव' ही संकल्पना स्पष्ट करणा-या दोन कवितांचा आस्वाद घेऊयात. सन्मित्रहो ! या दोनही कवितांमधून कवीला दिसलेलं त्याचं 'लाडझरी' अंबाजोगाई-अहमदपूर मार्गावर घाटनांदूरजवळ चार किलोमिटर अंतरावर आहे.सामाजिक सलोखा, आपुलकी, जिव्हाळ्याच्या ऋणानुबंधांच्या धाग्यांनी विनलेलं हे टुमदार गाव 'लाडझरी'. हे गाव समजून घ्यायला कुण्याही वाचकाला मदत होईल आणि आनंदच वाटेल असं छान वर्णन कवीनं आपल्या गावाचं केलेलं आहे. आपल्या समजेची, हृदयाची, डोळ्यांची आणि अर्थातच मनाची नजर आणि नजरीया अर्थात दृष्टीकोन विशाल निर्माण झाला तर आपण बघू तिकडं आनंदाची जागा दिसते. रमेश मोटे यांच्या मनाची मशागत कविता लिहीणा-या, कथा लिहिणा-या,तुकोबाचा शब्द प्रमाण मानना-या आणि देशाच्या संविधानावर संपुर्ण विश्वास असलेल्या सज्जनांच्या सहवासात झाल्यामुळं त्यांच्या लिहिण्यात प्रत्येक







वाचकाला आपल्या अनुभवांची अनुभूती येत जाते. ही गावाबद्दलची कविताही आपल्याला आपल्या गावाची आठवन करुन देणारीच आहे. अशा कवितांच्या आणि अर्थातच साहित्याच्या वाचनाने माणसाचे मन मोहरुन येत असते आणि हातून कांही छान घडून जातंअर्थातहेआजचंसदरलेखणहीआलंच.

**वाणगी दाखल रमेश मोटे यांच्या 'भूमीका आणि वास्तव' या संदर्भातील दोन आषयसंपन्न कविता :** १ ) कवितेचं गाव : ही पहिली कविता 'कवितेचं गाव' कवी रमेश मोटेंनी लिहिली ज्यात 'कविच्या संकल्पनेतलं गाव' आहे. या कविच्या गावात 'समतेची वाट आहे, गोड पाण्यात निर्मळ पाट आहे, या गावीतली भाषा नवरसांची नजाकत घेऊन सजलेली आहे, यातली वस्ती लहान थोरांपर्यंत सद्गुणी माणसांची आहे.यात साहित्याच्या मैफिलींनी सजलेली घरं आहेत. जाणिवांच्या खतपाण्यानं बहरलेली सुगी आहे. इथं नीतीमत्ता मुरल्यानं अन्यायी वैर नाही.जात

**कवितेचं गाव**

**माझ्याकवितेच्यागावा;एकसमतेचीवाट,**
**गोड नितळ पाण्याचा ; वाहतो बारमाही पाट.**

**माझ्या कवितेच्या गावी ; ओल्या आठवांच्या**
**किनारी, नवरस अलंकार ; भाषा नाजुक सुंदरी.**

**माझ्या कवितेच्या गावी ; वस्ती हळव्या**
**मनाची, सानथोर सारी एक ;**
**माझी माणसं गुणाची.**
**माझ्याकवितेच्यागावी;घरअनेकमजली,**
**कथा, नाटक लावण्यांची ; सदा मैफिल**
**सजली.**

**माझ्याकवितेच्यागावी;रोपअक्षर वाढते,**
**खतपाणी जाणिवांचे ; सुगी जोमात जडते.**

**माझ्याकवितेच्यागावी;नाहीअन्याय,**
**नितीमत्ता संस्काराचा ; ठेवला मुरवून खार.**

**माझ्याकवितेच्यागावी;नाहीजात,धर्म,पंत,**
**एका मायीची लेकरं ; धरती आकाश निवांत.**

**माझ्याकवितेच्यागावी;नाहीमंदीरमस्जिद,**
**सर्वांसाठी सर्वेश्वर ; नसे कुटाळ विवाद.**

धर्म पंतांपासून हे गाव कोसो दूर आहे.या कवितेत गावात मंदिर मज्जिद नाही परंतू सर्वेश्वर आहे जो सगळ्या गावाचा आहे.

२ ) माझा गाव : 'माझा गाव' अर्थात 'कवीचं गाव' ही कवी रमेश मोटे यांची दुसरी कविता त्यांच्या 'लाडझरी' या प्राणप्रिय गावाबद्दलआहे, लाडझरीचा गुगलमॅप' आहे. हा नकाशा हातात घेऊन गाव फिरलो की आपल्याला डोळेझाकुन लाडझरीचं पर्यटन करता येतं. जे आहे, जसं आहे ते अगदी तसंच्या तसं लयबद्धतेनं आणि अपुर्व आनंदानंच रमेशनं रेखाटलं आहे. कविच्या निष्कपट, निष्कलंक, नितळ, निर्मळ नजरेनं रेखाटलेलं हे लाडझरी गावाचं शब्दचित्र आहे जे प्रत्येक लाडझरीकरांनी आपल्या घराच्या दर्शनी भागात, सोबत गावाचा फोटो काढुन हॉलमधे लावून ठेवावं आणि गावच्या शाळेनं लाडझरीचा भूगोल शिकवताना ही कविता लेकरांना दाखवावी, मराठीच्या शिक्षकानं लेकरांना 'माझा गाव' निबंध लिहायला लाऊन शेवटी लेकरांनी लिहिलेला गाव रमेशच्या या कवितेशी जुळवून पहावा, इतिहासाच्या गुरुजींनी लाडझरीचा इतिहास सांगताना, शिकवताना ही कविता प्रमाण मानुन शिकवायला हरकत नाही आणि गावाच्या मंदीरांच्या आवारात, वेशीवर, बसस्थ्यांडला इतकं हे क्रीस्टल क्लियर अर्थात तंतोतंत जशास तसं वस्तुनिष्ठ चित्रण आहे, आकलन आहे. या कवितेतून शब्दचित्रीत झालेली देवालयं, सण-वार, सप्ते- गावजत्रा, दुकाणं, गल्या, रस्ते, झाडं, घरं आणि गावच्या लेकी-बाळी, पोरंसोरं, बुजुर्ग अशा सगळ्यांच्या व्यक्तिविषेशासह आलेली माणसं या कवितेनं अजरामर केली आहेत.जगणं साहित्यातुन आलं की अमरत्वाच्या आत्म्याची कापडं घालूनच येत असतं.ती किमया या रमेशच्या 'माझा गाव' कवितेनं केली आहे.या अमरत्वाचा आपण अनुभव घ्या... आनंदाची पोंच पावती : आठ, नऊ, दहा, आकरा जूनच्या दरम्यान चार-पाच साहित्यिक सन्मित्रांचा वाढदिवस येवून गेला ज्यात जेष्ठ कवी तथा विडंबनकार प्रभाकर साळेगावकर माजलगाव, घाटनांदुरचेच मुळात परंतू छत्रपती संभाजीनगरला स्थिरावलेले सन्मित्र कवी श्रावण गिरी, घाटनांदूरचे कवी, कथाकार आणि छायाचित्रकार दत्ताभाऊ वालेकर आणि घाटनांदुरचे मुख्याध्यापक, हजरजबाबी वक्ते तथा कविवर्य दि.ना.फड आणि कवी, बालकथाकार रमेश मोटे चांचा वाढदिवस होता परंतू घरगुती पळापळींमुळं ना कुणाला फोन करता आला ना फेसबुकावर शुभेच्छापर चार शब्द लिहिता आले.श्रावण गिरी महोतयांची मागीलवर्षीची पोस्ट फेसबुकानं रिमाईंड करुन दिली आणि ती वेळेअभावी मी तशीच शेअर केली. या सन्मित्रांच्या कर्तुत्वाच्या संदर्भानं फेसबुकावर इतर मित्रांनी लिहिलेल्या आनंददायी पोस्ट्सवर मग मी ही हार्दिक शुभेच्छा दिल्या.यावेळी या सर्व सन्मित्रांमधे माझ्या भवतालात वयानं सर्वात लहान असलेल्या रमेशला केंद्रस्थानी ठेऊन लिहावं आणि सर्वांना हार्दिक शुभेच्छा द्याव्यात असं क्षणभर वाटलं आणि परवा आडसच्या कविसंमेलनानंतर परत येताना रमेश मोटे यांनी दिलेला 'ग्रामिण कवितेचा काव्यसुगंध' आठवला.हा रमेशचा दुसरा कवितासंग्रह जो वसुंधरा महाविद्यालयाने छापून आपली माजी विद्यार्थ्यांप्रती उत्तरदायित्वाची भावना जपली आहे. या निमित्ताने या कवितासंग्रहाच्या संपादकीय मंडळालाही हार्दिक शुभेच्छा द्यायला हव्यात.प्राचार्य डॉ. अरुण दळवे सर, उपप्राचार्य डॉ.अर्जून मोरे,डॉ. संजय खाडप,डॉ मकरंद जोगदंड, डॉ.बायजा कोटुळे, डॉ गजानन सवणे,श्री प्रशांत देशमुख , प्रा. नरसिंग उदार आणि विद्यार्थीनी प्रतिनिधी कु अश्विनी कांबळे या 'शब्दाई'च्या संपादकीय मंडळाला या सुंदर कामासाठी हार्दिक शुभेच्छा.फुरसदीने चाळावा म्हणून मी हा अंक स्कुटरच्या डिक्कीतच ठेवला होता.काल-परवा सायंकाळी सायंशतपावली नंतर आवर्जून चाळला आणि त्यातील लेखात उद्धतकेलेल्या दोन आषयसंपन्न कविता माझ्या संशोधक नजरेतून सुटल्या नाहीत. तशा या पुस्तकातील सगळ्याच सत्तरच्या सत्तर कविता सुंदरच आहेत. मुळातच कवितेची आवड असल्यानं,सगळ्या कविता मन लावून वाचल्या, अर्थात कविता संग्रहातील भाव-तरलतेनं माझ्याकडून वाचूनच घेतल्या. असं कांही सुंदर,वास्तवाला धरुन असलेलं वाचताना माझ्या संवेदनशील मनाचा टीपकागद बरोबर नजाकतीला, तालबद्ध तरल भावनेला, नाविन्याला टिपत जातो.नजरेला पडून काळजाचा ठाव घेतलेल्या या दोन परस्पर पूरक, भूमीका आणि वास्तव सांगणा-या कवितांनी आजच्या सदरासाठी हे कांही लिहिण्याचा माझ्या नकळंत आग्रहधरला आणि हा मसुदा तयार झाला. रमेश ! तू छानच लिहितोस बाळ ! नियमीत लिहित रहा ! तू लिहिलेली कविता, वृत्तपत्रातून छापून आलेल्या एकुन-एक बालकथा वाचत असताना मला जाणवलेलं नेहमीच सविस्तर मांडंत आलो आहे.

**माझा गाव**

**माझ्या गावची शाळा ; महापुरुषाची वसरी**
**झाडा-झुडपाच्या गारव्यात ; गाव नांदते लाडझरी.**

**माझ्या गावाच्या मुखाशी ; गोडी सुखाची भेटेल**
**जुन्या गोठ्यातुन दिसं ; लिंबा गुट्टेचं हाटेल.**

**दोन्ही बाजूच्या पवळीतुन ; वाट पळते चंचल**
**गावकुसातुन दिसं ; नरुबा देवाचं पिंपळ.**

**चार पावलाच्या आत ; नाकाडे तात्याचं घर**
**दोन वावेच्या आंतरी ; पुढं मारुतीचा पार.**

**पोरं खेळायची तिथं ; इट्टी-दांडू वडाखाली**
**गोट्या चिचुके खेळाया ; समद्या सावलीच्या गली.**

**पुढं उजव्या हाताला ; छोटं आईचं मंदिर**
**मजा दस-यात गोंधळाला ; माळ परडीचा जागर.**

**इथं रस्त्याच्या बाजुला ; नांदुरकीची छाया गार**
**करी आठदिसा धंदा ; तिथं बसून चांभार.**

**तेला मिठासाठी तवा ; फक्त तीनच ठिकाणं**
**संबु गुट्टे, महादू काका ; सदामामाचं दुकान.**

**माझा गाव तवा ; लादणी माळवदाची वस्ती**
**कुडा पत्राचीच घरं ; छतं कुठं तरी दिसती.**

**माझ्या गावच्या मध्यात ; रस्ते धावती चौफेर**
**दगडा धोंड्यांच्या कलेत ; तिथं नागोबा मंदिर.**

**पुढं पाऊल टाकता ; खाली लागतो उतार**
**भोळ्या शिवाला पुजती ; माझ्या गावचे डॉक्टर.**

**माझ्या गावाचं वैभव ; महादेवाचं मंदिर**
**वडा पिंपळाच्या भवती ; गोल चक्राकार फेर.**

**मधी लहानशी ववरी ; पुढं पत्राचा मंडप**
**श्रावणाच्या सोमवारी ; बसे भवती पंगत.**

**भवती दाट गर्द झाडी ; त्याला पवळीचं कुंपण**
**आठादिसा सोमवारी ; सणावाराला भजन.**

**चैत्रमासात लेकमातानी ; सम्दं मंदिर भरते**
**भेटीगाटीत आठवनींची ; जत्रा लगेच सरते.**

**माझ्या गावाला लाभला ; रानामाळांचा शिवार**
**हिरव्या पारव्या पालव्यांचं ; अरं भरलेलं माहेर.**

**शेती भातीच्या कामासाठी ; कलावंतांची मोठी भर**
**दासू, भानू दोन सुतार ; जोडीला कानघुले कुंभार.**

**माझ्या गावात पुर्वेला ; आड बामनाचा जुना**
**पलिकडं दोन वस्त्या ; सम्दा एक गावठाणा.**


**इकडं पश्चिम भागाला ; काट्या धुळीतली वाट**
**तिन आंब्याची झाडं तिथं ; बाकी मोकळं खारवट.**

**वर रस्त्याच्या पल्याड ; देवा ज्योतिबाचं ठान**
**तिथं कसदार सारी ; काळी माती मोकळं रान.**

# सर्जनशीलता जोपासणारा सर्जन : डॉ. गणेश गायकवाड

आधुनिक केसरी

**किसी भी जुल्म की दहशत बहुत दिन तक नही रहती किसी जालिम के घर शोहरत बहुत दिन तक नहीं रहती। मिंया यह तो हवा है, अपना रुख अक्सर बदलती हैं, यह शोहरत शान ए शौकत बहुत दिन तक नहीं रहती।। तुमचं ऐश्वर्य, प्रसिद्धी, रुतबा, तुमची श्रीमंती ही काही काळाची सोबती असते. माणसाशी माणसासारखं वागता आलं तर माणसाला अमरत्व देखील प्राप्त होतं, त्यासाठी माणूस होता आलं पाहिजे. माणसाशी माणसासारखं वागत त्यांच्या पीडा जाणणारा,माणसाकडे माणसासारखं पाहणारा, आणि जातीयतेची आपल्या कौशल्याने शस्त्रक्रिया करून जातीयवाद काढून फेकत एकतेची- समानतेची बीजं रोवणारा,सर्जनशीलता जोपासणारा सर्जन म्हणून ज्यांच्याकडे बघितल्या जाते ते म्हणजे प्रख्यात शायर डॉ. गणेश गायकवाड.**




सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र.: 9422880080

मेहकरच्या मातीने अनेक क्षेत्रातील मातब्बर माणसं जिल्ह्याला बहाल केली. राजकारण, समाजकारण,अध्यात्म, शैक्षणिक,क्रीडा अशी कित्येक क्षेत्र आहेत की त्या क्षेत्रात त्यांच्या नावाने आजही मानाचा तुरा रोवल्या जातो आहे. सत्यशोधक चळवळीचा वारसा जिल्ह्यासह संपूर्ण विदर्भाला देणारे स्व. आनंदस्वामी यांच्या सोबत माजी खासदार लक्ष्मणराव भटकर, स्व. पंढरीनाथ पाटील यांच्या खांद्याला खांदा लावून काम करणारे त्यावेळचे सावत्रा ता.मेहकर येथील अग्रणी स्व. त्र्यंबकराव निकस,त्यानंतर हाच विचार घेऊन चालणारे स्व. आयाजी पाटील, मध्यप्रदेशातील दोन मतदारसंघातून एकाचवेळी निवडून येत खासदार होणारे आणि जिल्ह्याचे पहिले पदवीधर आमदार वि. घ. देशपांडे, पहिले आमदार स्व. आनंदरावबापू देशमुख, अध्यात्म क्षेत्रातील प्रख्यात कीर्तनकार हभप साहेबराव बापू काळे, विविध शैक्षणिक संस्था उभ्या करत विदर्भातील पहिला साखर कारखाना उभा करणारे ऍड. शंकरराव उपाख्य अण्णासाहेब देशमुख, राष्ट्रीय पातळीवरील फुटबॉल चे खेळाडू आणि मेहकर मतदारसंघाचे दोनवेळा प्रतिनिधित्व करणारे सीताराम चिनकाजी उर्फ भाऊसाहेब लोढे,साहित्याच्या क्षेत्रात ज्यांची 'शीळ' देशभर ऐकायला मिळाली असे कविवर्य ना. घ. देशपांडे, शिक्षकांमधून स्पर्धा परीक्षेद्वारे विदर्भातून पहिले शिक्षण विस्तार अधिकारी झालेले स्व. रा. ना. पवार, त्याकाळात उच्च वैद्यकीय शिक्षण घेऊन डॉक्टर होणारे गो. द. देशपांडे, डॉ. स. तू. चवरे, डॉ. की. ना. बोडखे,दादासाहेब सोमण ही सगळी वेगवेगळ्या क्षेत्रातील दिग्गज मंडळी.ह्या मंडळींनी मेहकर तालुक्याचा इतिहास सुवर्णाक्षरांनी लिहला आहे. ह्या धावत्या आढाव्यात अनेकांच्या नावाचा उल्लेख अनावधानाने राहणार असल्याची मला जाणीव आहे.असे असले तरीही जुन्या पिढीचा हा इतिहास असतांना नव्या पिढीने देखील आपल्या कार्यकर्तृत्वाने त्यात भरच टाकली आहे. डॉ. गणेश गायकवाड हे रत्न देखील मेहकरच्या मातीतले. मेहकर तालुक्यातील डोणगाव येथील सर्वसामान्य कुटुंबातील आणि एका शिक्षकाच्या पोटी जन्मलेल्या या माणसाने नवल वाटावे अशा क्षेत्रात आपले नाव उज्वल केले आणि ते देखील उर्दू साहित्य प्रांतात. उर्दू भाषा ज्याला कळली तो तिच्या प्रेमात आकंठ बुडल्या शिवाय राहत नाही.उर्दू भाषेला आपले स्वतःचे एक अद्भुत सौन्दर्य आहे,लय आहे,अदब आहे आणि एक विशिष्ट असा लेहजा या भाषेला प्राप्त झाला आहे.उर्दू भाषा भलत्या सलत्या ला आपल्या आसपास देखील फिरकू देत नाही.

बुलडाणा जिल्ह्याचे वेगळेपण म्हणजे मराठी असलेल्या तसेच निष्णात शल्यचिकित्सक असलेल्या डॉ. गणेश गायकवाड यांनी उर्दू साहित्यात अर्थात शायरी च्या प्रांतात आपलं नाव देशभर नेऊन पोहचवलं आणि दुसरीकडे अजीम नवाज राही या अमराठी अवलियाने माय मराठीत साहित्य निर्मिती करत माय मराठी ला साता समुद्रापार नेलं आहे...

डॉ. गणेश गायकवाड प्रतिकूल परिस्थितीतून शिकलेल्या आणि सर्जन झालेल्या या माणसाने आजच्या सुखाच्या सावलीत देखील गरिबीतले चटके कधी नजरेआड केले नाहीत.

अलीकडच्या काळात आणि त्यातल्या त्यात वैश्विक महामारी कोरोना च्या काळात काही सन्माननीय अपवाद वगळता समाजाचा डॉक्टरांवरील विश्वासच उडाला होता. युद्धजन्य परिस्थिती निर्माण झालेली असतांना दुसरीकडे डॉक्टरांनी रुग्णाच्या असहायतेचा फायदा घेत जी लूट केली ती पाहू जाता लोकांचा डॉक्टरांवरील विश्वास उडणें साहजिकच होते. तर दुसरीकडे मात्र सामाजिक संवेदना जिवंत ठेवण्याचे काम डॉ. गणेश गायकवाड यांनी केले.

एका कार्यक्रमानिमित बुलडाणा येथे गेलो असता मित्रवर्य आणि शेतकऱ्यांचा राज्यपातळीवरील नेता असलेल्या रविकांत तुपकर या मित्राने जेवता जेवता सहजच गप्पा गप्पात एक विषय सांगितला आणि डॉ गणेश गायकवाड या माणसाची माझ्या मनात असलेली प्रतिमा आणखी उजळून निघाली.

रविकांत तुपकर धडपड्या आणि चळवळीतला माणूस. कुठल्याही आंदोलनाची आणि त्याच्या परिणामाची पर्वा न करता रस्त्यावर उतरणारा आणि लोकांना न्याय मिळवून देणारा खमक्या युवानेता.

एका एसटी बसच्या अपघातात पती पत्नी दोघेही आपल्या जीवाला मुकतात आणि त्यांच्या दोन मुली आणि एक मुलगा अशी भावंडं रस्त्यावर येऊन पडतात. रविकांत तुपकर हा नेता त्या गावाला सांत्वनभेटीला जातो. भेटीला गेल्या नंतर गावकरी म्हणतात..भाऊ,आता या मुलांनी कुणाकडे बघायचं. यांचं पालन पोषण कुणी करायचं...? यांचा वाली कोण..? नातेवाईक आहेत,पण त्यांना त्यांच्याच संसाराचे ओझे उचलेनासे झाले आहे.ह्या जगात देव तरी आहे की नाही...? या मुलांनी काय पाप केले होते की देवाने त्यांच्या डोक्यावरील छप्पर च काढून घेतले. अशा हृदयाला पिळ देणाऱ्या गप्पा त्या ठिकाणी सुरू



असतांना भावनाविवश होत तुपकरांनी ,या मुलांना मी दत्तक घेतो,तुम्ही काळजी करू नका असे सांगितले आणि 'कळकळीतून' बोलून गेलेला हा 'चळवळी' तील पठ्या नंतर मात्र विचार करायला लागला.आपण तर शब्द देऊन बसलो,बायकोला आपण विचारातही घेतले नाही.ती काय म्हणेल..? आधीच आपण बारा गावचे मुंजे..6,7 कार्यकर्त्यांना आपल्या डब्यात घेऊन जेवायला बसणारे हा विचार डोक्यात असतांना पत्नी ऍड. शर्वरी तुपकर यांना रविकांत तुपकर यांनी सगळा घटनाक्रम सांगितला. पत्नी ऍड. शर्वरी नवऱ्याच्या निर्णयात सामील झाली आणि नंतर सुरू झाला प्रवास त्या मुलांना शाळेत कुठे टाकायचे.मुलांचे साहजिक आहे पण मुलीच्या जातीला कुठे ठेवणार?..आपण चळवळीतले, हजारो कार्यकर्ते रात्री अपरात्री घरी येतात असे अनेक प्रश्न तुपकरांसमोर उभे राहिले... जवळच्या व्यक्तींनी मदतीचे दिलेले शब्द फिरवले असे असतांना एक दिवस डॉ. गणेश गायकवाड यांचा रविकांत तुपकरांना कॉल येतो. आपण त्या अपघातातील मृतकांची मुले दत्तक घेतल्याचे मला समजले.आपल्याला त्या मुलांना भेटायला जायचं,तुम्ही सोबत चला असे डॉ गणेश गायकवाड म्हणतात आणि तिथे जाईपर्यन्त तुपकर यांना देखील काहीही न कळू देता डॉ. गणेश गायकवाड त्या तिन्हीही मुलांच्या नावे सन्मानजनक निधी त्यांच्या नावे मुदती ठेवी च्या रुपात टाकतात,अशी कित्येक उदाहरणे डॉ. गणेश गायकवाड यांच्या बाबतीत आहेत. रुग्णाच्या परिस्थितीचा अजिबात विचार न करणारे डॉक्टरच दुर्दैवाने जादा प्रमाणात दिसून येत असतांना, अनेकांवर मोफत शस्त्रक्रिया करून देखील केलेली मदत कुणाला कळणार नाही याची काळजी घेणारे डॉक्टर गणेश गायकवाड माणूस म्हणून सर्वश्रेष्ठ आहेत. आईच्या मेहनतीचे,शिक्षणासाठी तिने घेतलेल्या कष्टाचे आणि वडिलांच्या संस्काराचे मोल जाणणारे डॉ गणेश गायकवाड शायरी च्या क्षेत्रात देशपातळीवर अव्वल असून ह्या जिल्ह्याच्या वैभवात भर घालणारी त्यांची शायरी आहे.

**चाहत के किसीं दिलमे अरमान नही आते**
**पहले की तरह घरमे मेहमान नही आते**
**हर रोज फरीष्ते तो आते है मुझे मिलने**
**लेकीन मेरे दरपर अब इंसान नही आते**

पूर्वीचे ते सुगीचे दिवस आता मावळले आहेत. पूर्वी घरी पाहुणे आले की घरात चैतन्य दरवळायचे. आता ते चैतन्य हरवले आहे.कारण आता पूर्वीसारखे पाहुणे घरी येत नाहीत. आयुष्यात अनेक फरीष्ते येतात मात्र आता कुणी माणूस आपल्या चौकटीत येत नसल्याची म्हणूनच डॉ.गणेश गायकवाड यांना खंत आहे.

डॉ. गणेश गायकवाड हा माणूसच जमिनीवर पाय असलेला डॉक्टर आहे. प्रथितयश सर्जन असणारे डॉ. गणेश गायकवाड मेहकर च्या दादासाहेब अवस्थी यांच्या घरी राहून मेहकर च्या एम. ई. एस. शाळेत शिकलेले विद्यार्थी आहेत. स्व. दादासाहेब अवस्थी यांनी देखील आपल्या मुलांच्या पलीकडे त्यांना जीव लावला व डॉ. गायकवाड यांनी देखील शेवटपर्यंत दादासाहेबांचा शब्द प्रमाण मानला.

डॉ. गणेश गायकवाड यांची साहित्य निर्मिती खूप मोठी आहे.पुरस्कारांची यादी देखील मोठी आहे.महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी च्या वतीने त्यांना कभी सोचा न था या साहित्यकृतीसाठी संत नामदेव पुरस्कार मिळालेला आहे.तर मानव संसाधन विकास ग्रंथालय भारत सरकार कडून हिंदी भाषी हिंदी लेखक पुरस्कार अंतर्गत मंजर बदल न जाय या संग्रहासाठी एक लाख रुपयांचा पुरस्कार मिळालेला आहे.

त्यांच्या साहित्याच्या शायरीच्या बाबतीत अनेकांनी लिहले आहे.परंतु त्यांच्यातील माणूसपण,सर्वांप्रति त्यांनी जोपासलेला गोडवा,आपल्या डॉक्टरी पेशाचा लोकांच्या सेवेसाठी केलेला सदुपयोग आणि व्यवसाय न करता त्यात जपलेला सेवाभाव निश्चितच अभिमानास्पद आहे...

शेवटी असंच म्हणता येईल की,

**टेड़ी मेडी राहों पर तू धीरे धीरे चलना सीख**
**चांद जैसा शीतल बन और सूरज**
**जैसा जलना सीख।।**
**कांटों के संग रहकर भी तू फूलों**
**जैसा खिलना सीख**
**मिट्टी का तू है पुतला तू**
**हर सांचे में ढलना सीख**



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

# कुस्तीपटुंना न्याय मिळायला हवा

आधुनिक केसरी

**दि.23 एप्रिल 2023 पासून कुस्तीपटुं आंदोलन करीत होते.परंतु सरकारच्या आश्वासना नंतर कुस्तीपटूंनी एक पाऊल मागे हटुन तात्पुरते आंदोलन मागे घेतले.कुस्ती महासंघाचे अध्यक्ष व खासदार बृजभूषण शरण सिंह यांच्यावर लैंगिक शोषणाच्या आरोपाखाली 15 जूनपर्यंत आरोपपत्र दाखल करण्याचे आश्वासन केंद्र सरकारने दिल्यानंतर कुस्तीपटूंनी आंदोलन मागे घेतले.यानंतर कुस्तीपटुंना न्याय मिळण्याच्या आशा उंचावल्या आहेत.**

त्यामुळे देर आऐ दुरूस्त आऐ कुस्तीपटुंना न्याय अवश्य मिळेल याची मला खात्री आहे.परंतु कुस्तीपटूंना शंका आहे की 15 जूनला न्याय मिळेलच याची खात्री नाही.

त्यामुळे 15 जूनला जर योग्य न्याय मिळाला नाही तर 17 जूनला पुन्हा नव्याने आंदोलनाच्या रणनीतीवर चर्चा करण्यात येईल असे कुस्तीपटू बजरंग पुनियान सांगितले आहे.साक्षी मलिक म्हणतात की आम्ही आशियाई खेळांमध्ये तेव्हाच सहभागी होऊ जेव्हा सर्वच समस्या दूर होऊन आमच्या मागण्या मान्य होईल.म्हणजेच 15 जूनला तोडगा निघेलच यांची कुस्तीपटू हमी (गॅरंटी) नाही.कारण दिल्ली पोलिसांनी महिला कुस्तीपटूंना लैंगिक शोषणासंबंधी व्हिडीओ व ऑडिओ देण्याची नोटीस बजावली आहे.अशा प्रकारे छळाचे पुरावे मागविले आहेत ही आश्चर्यजनक व गंभीर बाब आहे. त्यामुळे याप्रकरणात सरकारचे वेळकाढू धोरणं तर नाही ना असाही प्रश्न उपस्थित होत आहे.कारण कोणताही खेळाडू असो तो देशाची "आन-बाण-शान"आहे. कारण दिनांक 23 सप्टेंबर ते 8 आक्टोंबर पर्यंत आशियाई क्रीडा स्पर्धा चीनच्या हांगझाऊमध्ये होणार आहे.याकरीता भारतीय टीमची निवड (सिलेक्शन) 30 जूनच्या आधीच होणार आहे.त्यामुळे कुस्तीपटुंच्या आंदोलनातील कोणत्याही खेळाडूंवर कोणतीही आच येणार नाही याची काळजी सरकारने व क्रीडा मंत्रालयाने घ्यावी व त्यांच्यावर आंदोलना दरम्यान असलेले संपूर्ण गुन्हे मागे घ्यावे आणि त्यांचा आशियाई स्पर्धा खेळण्याचा मार्ग मोकळा करावा. त्याचप्रमाणे सरकारने हेही लक्षात ठेवले पाहिजे की आंदोलनाचा आशियाई खेळांवर कोणताही परिणाम होवू नये याकरिता 15 जूनपर्यंत बृजभूषण शरण सिंह यांच्या आरोपांबद्दल अंतिम निर्णय घ्यावा.कारण कोणीही आरोप जेव्हा करतो तेव्हा त्यात अर्धसत्य अवश्य असते.परंतू आता बृजभूषण शरण सिंह यांच्यावरील आरोपांची लिस्ट वाढण्याची शक्यता दिसत आहे.कारण सात कुस्तीपटुंच्या आरोपानंतर रेफरी जगबीर सिंह यांनी आरोप लावले आहेत.यानंतर फिजियोथेरेपिस्ट परमजीत मलिक यांनीही बृजभूषणवर आरोप केला आहे की कुस्तीपटुंचे आरोप 100 टक्के खरे आहेत.कुस्तीपटुंना वारंवार त्रास देने, शारीरिक शोषण सुध्दा होत होते. अनेक वर्षांपासून कुस्तीपटुंशी जुळलेल्या परमजीत मलिक यांनी केलेल्या आरोपांमुळे बृजभूषण शरण सिंह यांची मुश्किले आणखी गडद होवू शकते.परमजीत मलिकने म्हटले आहे की 100 कुस्तीपटुंचा मानसिक आणि शारीरिक शोषण झाले आहे.या घटना अनेक दिवसांपासून सुरू आहेत.या परमजीत मलिक यांच्या गंभीर आरोपांमुळे बृजभूषण शरण सिंह यांची मुश्किले पुन्हा वाढली आहे. बृजभुषणवर लावलेले आरोप खरे की खोटे याची 15 जूनला गांभीर्याने चौकशी व्हायलाच हवी. कारण कोणी जेव्हा आरोप करतो तेव्हा त्यात अर्धसत्य अवश्य असतें व कारवाई नंतर सत्य सामोरं येते.त्यामुळे ब्रिजभुषण शरण सिंह यांच्यावर असलेले आरोप अत्यंत गंभीर,घृणास्पद आणि निंदनीय आहे. त्यामुळे त्यांना भारतीय कुस्ती महासंघाच्या अध्यक्षपदावर रहाण्याचा तिळमात्र अधिकार सुध्दा नाही. सरकारने लक्षात ठेवले पाहिजे की देशाचा प्रत्येक खेळाडू देशाची पुंजी आहे. त्यामुळे ब्रृजभूषण सारखे अनेक अध्यक्ष येतील आणि जातील. परंतु खेळाडू तयार करायला अनेक वर्षे लागतात.खेळाडुंना न्याय मिळत नसल्याने त्यांनी मेडल सरकारला परत करण्याची घोषणा केली होती.यावर बऋजभूषण शरण सिंह म्हणाले होते की सरकारने दिलेले पैसे परत करावे.त्यावर बॉक्सर विजेंदर सिंगने प्रत्युत्तर दिले अमेरिकेतील बॉक्सरने आपलं पदक नदीत बुडविल होत. यामागचे कारण म्हणजे वर्णभेदावरून झालेला अपमान सहन न झाल्याने त्याने ही कृती केली आणि अमेरिकेत क्रांती झाली होती.त्यामुळे सरकारने 15 जूनला योग्य निर्णय घेवून कुस्तीपटुंना न्याय द्यावा.कारण खेळाडूंना तयार होण्याकरिता अगोदर तालुका स्तरावर खेळावे लागते,नंतर जिल्हा स्तरावर, नंतर राज्य स्तरावर यात अव्वल खेळावे लागते तेव्हा देशात अव्वल नंबर लागतो.यातुनच आंतरराष्ट्रीय खेळांमध्ये नियुक्ती होते.म्हणजे संपूर्ण चक्रव्यूह पार केल्यानंतरच खेळाडूंना आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळता येते.त्यामुळे प्रत्येक खेळाडू हा आपल्या मेहनतीने व कर्तुत्वाने तयार होतो. कुस्तीगिर खेळाडूंचे आंदोलन पहाता आजी-माजी खेळाडूंनी आंदोलक कुस्तीगीरांना खुले समर्थन द्यायला हवे.कारण प्रत्येक क्षेत्रातील खेळाडू हा देशासाठी खेळत असतो.त्यामुळे देशाचे सर्वच खेळाडू देशाची आन-बान-शान आहे.कुस्तीपटुं खेळाडूंना आशियाई स्पर्धेच्या आधी योग्य न्याय मिळेल हीच अपेक्षा.जय हिंद!



# जितकी लांब चादर तितकेच पाय पसरावे

आधुनिक केसरी

अकबरच्या दरबाऱ्यांची नेहमीच एक तक्रार असे की बादशाह नेहमी बिरबललाच बुध्दीमान मानतात बाकीच्यांना नाही. एक दिवस अकबरने सर्व दरबाऱ्यांना दरबारात बोलविले आणि दोन हात लांब व दोन हात रूंद चादर त्यांच्याकडे देत म्हणाले, ‘या चादरीने तुम्ही लोकं मला डोक्यापासून तर पायापर्यंत झाकून दाखवा तर मी तुम्हाला बुध्दीमान मानेल.’ सर्व दरबाऱ्यांनी प्रयत्न केला परंतु ते त्या चादरीने अकबरला पूर्णपणे झाकू शकले नाही. डोके झाकले तर पाय बाहेर रहायचे, आणि पाय झाकले तर डोके चादरीच्या बाहेर रहायचे. आडवे, उभे, तिरपे सर्व प्रकारांनी प्रयत्न करून देखील कोणालाही त्यात यश आले नाही.

आता अकबरने बिरबलला बोलविले व तीच चादर त्याला देत स्वतःला त्यात झाकून दाखविण्यास सांगितले. जेव्हा अकबर खाली झोपला तेव्हा बिरबलने अकबरचे पसरलेले पाय मुडपण्यास सांगितले. अकबरने बिरबलने सांगितल्याप्रमाणे पाय मुडपले आणि बिरबलने अकबरला आता डोक्यापासून पायापर्यंत चादरीने झाकले. सर्व दरबारी आश्चर्याने बिरबलकडे बघत होते. तेव्हा बिरबल बोलला, ‘जेवढी लांब आपली चादर असेल तेवढेच आपण पाय पसरावेत.’

# श्याम ठाणेदार यांना राष्ट्रीय आदर्श लेखक प्रेरणा पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**बेळगाव :** येथील आधार सोशल फाउंडेशनच्या वतीने महाराष्ट्र, कर्नाटक व गोवा राज्यातील वर्तमानपत्रात लेखन करणाऱ्या लेखकांना राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात येते. यावर्षी महाराष्ट्रातील स्तंभलेखक श्याम ठाणेदार यांना या संस्थेच्या वतीने राष्ट्रीय आदर्श लेखक प्रेरणा पुरस्काराने गौरविण्यात आले. यावेळी डॉ बाळासाहेब कर्णवर पाटील ( अध्यक्ष सदगुरु साखर कारखाना सोलापूर ) प्रकाश कदम ( प्रसिद्ध लेखक व वक्ते ) मिसेस इंडिया, शुभांगी शिंत्रे, विक्रमसिंग घाडगे, पूनम चौधरी, अविनाश कांबळे, डॉ वसंत शिंगाडे ( अध्यक्ष, आधार सोशल फाउंडेशन बेळगाव ) आदी मान्यवर उपस्थित होते. बेळगाव ( कर्नाटक ) येथील हॉटेल नियाज येथे रविवार दिनांक ११ जून रोजी झालेल्या दिमाखदार सोहळ्यात त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. यावेळी महाराष्ट्र, कर्नाटक व गोवा या राज्यातील वर्तमानपत्रात लेखन करणारे वृत्तपत्र लेखक तसेच विविध क्षेत्रात काम करणारे मान्यवर मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. श्याम ठाणेदार हे महाराष्ट्रातील प्रसिद्ध स्तंभलेखक असून ते महाराष्ट्रातील विविध वर्तमानपत्रात स्तंभ लेखन करतात. महाराष्ट्रासह गोवा आणि कर्नाटक राज्यातून प्रसिद्ध होणाऱ्या मराठी वर्तमानपत्रात त्यांचे लेख प्रसिद्ध होतात. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घडमोडींवरील त्यांचे लेख कर्नाटकमधील मराठी वर्तमानपत्रात प्रसिद्ध होत असतात. महराष्ट्राप्रमाणेच कर्नाटक व गोवा या राज्यातही त्यांचा वाचकवर्ग असल्याने त्यांना हा पुरस्कार देऊन आधार सोशल फाउंडेशन, बेळगावने त्यांचा गौरव केला आहे. कोल्हापुरी फेटा, श्रीफळ, सन्मानचिन्ह, गौरवपत्र, मेडल असे पुरस्काराचे स्वरूप आहे.





# सुगंधी तंबाखूची तस्करी उघडकीस

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** स्थानिक गुन्हे शाखेची दमदार कारवाई ऑन आर्मी ड्यूटी' लिहीलेल्या वाहनातून होणारी सुगंधीत तंबाखूची तस्करी उघडकीस आणली असून कारवाई करण्यात आली आहे पथकाने सोनगीर शिवारातील मुंबई आग्रा महामार्गावरील हॉटेल न्यु सदानंद जवळ ही कारवाई केली आहे.

या कारवाईत कंटेनरसह तंबाखूचे २० खोके व न लोखंडी अँगल असा एकूण १३ लाख ८८ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी कंटेनर चालकाविरुध्द सोनगीर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या संदर्भात, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांना दि. ११ रोजी गुप्त माहीती मिळाली होती की, आयशर कंटेनर ( युपी ८३/ सीटी-५८७७ ) मधून महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेली सुगंधीत तंबाखुची दिल्ली ते कोची ( केरळ ) अशी वाहतुक होत असून हा कंटेनर सोनगीरकडून धुळे शहराकडे जाणार आहे.त्यानुसार, निरीक्षक श्री. पाटील यांनी गुन्हे शाखेच्या पथकास खात्री करून कायदेशीर कारवाई करण्याच्या सूचना केल्या त्या अनुषंगाने गुन्हे शाखेच्या पथकाने मुंबई-आग्रा महामार्गावर संबंधीत कंटेनरचा शोध घेतला असता हे कंटेनर २ वाजेच्या सुमारास सोनगीर शिवारात असलेल्या हॉटेल न्यु सदानंद जवळ मिळुन आले. पथकाने कंटेनरच्या चालकाची विचारपुस केली, तेंव्हा त्याने आपले नाव बबलु रामप्रकाश प्रजापती ( २७ ) रा. इमलिया डांग पोस्ट- बमरारा ता चरखारी जि. महुबा, उत्तरप्रदेश असे सांगितले. तसेच त्याच्या ताब्यातील कंटेनरच्या समोरील भागावर 'ऑन आमी ड्यूटी' असे लिहीलेले पथकाच्या निदर्शनास आले. त्यामुळे पथकाने कंटेनरमध्ये काय माल भरला आहे. अशी विचारणा चालकास केली. त्यावेळी त्याने कंटेनरमध्ये लोखंडी चॅनेलचे ट्रे असल्याचे सांगितले. आयशर कंटेनरची तपासणी केली. तेंव्हा कंटेनरमध्ये महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेली सुगंधीत तंबाखु मिळुन आली. या कारवाईत १ लाख ८ हजार रुपये किंमतीची सुगंधीत तंबाखुचे प्रत्येकी ५ किलो वजनाचे व १२० पुडे भरलेले २० खोके आढळून आले.

# पर्यावरणपूरक पत्रावळीतून वारकऱ्यांना अन्नदान

## प्लॅस्टिक थर्माकोल कचरामुक्त दिंडी; नागरिकांना सेवेची संधी

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** आषाढी एकादशीनिमित्त दरवर्षी निघणारी पंढरपूर वारी म्हणजे वारकऱ्यांसाठी आनंदाची पर्वणीच. शेकडो वर्षे हिंदुत्वाची अनेक स्थित्यंतरे पहात वारकरी पंढरीची वारी नित्यनेमाने करतो आहे. बदलत्या आधुनिक युगात, वाढत्या नागरिकरणामुळे आणि वारीतील वाढत्या संख्येमुळे स्वच्छता विषयात काही प्रश्न उभे राहिले. त्यावर उपाय म्हणून निर्मल वारी, निसर्ग वारी, प्रदूषण मुक्त वारी अभियान सुरु आहे. 'थं क्रिएटीव्ह' या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून यावर्षी प्लॅस्टिक थर्माकोल कचरामुक्त दिंडी अभियान २०२३ राबविण्यात येणार असल्याची माहिती निसर्गवारी अभियानाचे प्रमुख प्रशांत अवचट यांनी दिली. वारीकाळात वारकऱ्यांना देण्यात येणारे भोजन प्लास्टिक किंवा थर्माकोलच्या पत्रावळीतून दिले जाते. त्यातून आरोग्याचा प्रश्न उभा राहतो. पर्यावरणपूरक पत्रावळीतून भोजन देऊन पर्यावरण संरक्षण आणि आरोग्याचे जतन करण्यासाठी 'थं क्रिएटीव्ह' संस्थेने पुढाकार घेतला आहे. त्यातून समाजाच्या हितासाठी पर्यावरण संरक्षण,निसर्ग संवर्धन, पाणी बचत, वारकऱ्यांचे आरोग्य, पत्रावळी वाटप ते संकलन रचना, कचरा मुक्ती सहज शक्य होणार असल्याचा विश्वास अवचट यांनी व्यक्त केला. संपूर्ण वारी मार्गावर अशा स्वरूपाच्या पत्रावळींचा वापर करण्यासाठी संस्थेने पुढाकार घेतला आहे. त्यासाठी आळंदी, देहू येथील नोंदणीकृत दिंडींचे चालक, व्यवस्थापक आणि स्थानिक संस्थांशी संपर्क करून या अभियानासाठी प्रबोधनपर कार्यक्रमही घेतले असल्याचे त्यांनी सांगितले. द्रोण पत्रावळींच्या वापराविषयी दिंडी चालक, वारकरी, अन्नदाते यांच्यामध्ये जनजागृती करणे. द्रोण पत्रावळीची उपलब्धता वाढवण्यासाठी दानशूर मंडळी, विक्रेते यांचा समन्वय साधणे. वारीमध्ये प्रदूषणकारी कचरा तयार होऊ नये यासाठी प्रयत्न करणे.



वापरलेल्या पत्रावळींचे संकलन करून त्याचे सेंद्रिय कंपोस्ट खत तयार करणार

या खताचे शेतकऱ्यांना मोफत वितरण

वाटप ते संकलन अशी ही मोहीम निश्चिती झाली आहे. पंगत झाल्यावर देण्यात आलेल्या पोत्यात वापरलेल्या पत्रावळी संकलन.

माउलींच्या पालखीमधील सर्व दिंड्यांना येत्या १५ जूनला आणि तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्यातील दिंड्यांना १६ जून रोजी संस्थेच्या वतीने पत्रावळींचे वाटप करण्यात येणार आहे.

**नागरिकांनाही सहभागाची संधी :** सर्वसामान्य नागरिकांनाही वारीकाळात सेवा द्यायची असते, अन्नदान करायचे असते त्यासाठी संस्थेने पेमेंट गेट वे सुरू केले आहे . त्याद्वारे नागरिकांना पत्रावळ दान करून अभियानात सहभागी होता येणार आहे . एका पंगतीसाठी अंदाजे ५०० जणांचे अन्नदान असते तितक्या पत्रावळी दान करता येणार आहेत . प्लॅस्टिक थर्माकोल कचरामुक्त दिंडी अभियान म्हणजे आपण ग्रहण असलेले अन्नही पर्यावरणपूरक ताटातून वारकऱ्यांच्या मुखात जाणार आहे . त्यातून त्यांचे आरोग्य उत्तम ठेवण्यास मदत होणार आहे . त्यामुळे सामान्य नागरिकांनीही या अभियानात सहभागी होऊन सामाजिक कार्यास हातभार लावावा असे आवाहन त्यांनी केले आहे . संपर्क – ९८८१०४९४३८



# भाजपा महिला मोर्चाच्या वतीने फुलंब्री पोलीस ठाणे येथे निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** चित्रा वाघ यांची बदनामी करणाऱ्या जितेंद्र आव्हाड यांच्यावर कारवाई करा भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांच्या विषयी अपमानाधारक व बदनामाकारक वक्तव्य करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यावर कठोर करण्यासंदर्भात ओळख बाजार फुलंब्री पोलीस टेशन मध्ये पोलीस निरीक्षक यांना निवेदन देण्यात आले यावेळी भाजपा महिला मोर्चाचे जेष्ठ नेत्या मंगलाताई वाहेगावकर तालुका अध्यक्ष ऐश्वर्या गाडेकर उपाध्यक्ष जानकाबाई काळे भाजपा युवा नेते अभिषेक गाडेकर यांची उपस्थिती होती.

# श्यामची आई पुस्तक वाचण्याचा संकल्प

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** साने गुरुजी लिखित श्यामची आई हे साने गुरुजींनी लिहिलेले संस्कारक्षम पुस्तक वाचण्याचा व इतरांनाही वाचण्यासाठी प्रवृत्त करण्याचा संकल्प करीत येथील पालिकेच्या वैजीनाथ वाचनालयात वाचकांनी साने गुरुजी स्मृती दिनी रविवार( ता,११ )रोजी साने गुरुजीच्या प्रतिमेला पुष्पहार व फुले अर्पण करीत अभिवादन केले, जेष्ठ वाचक सेवा निवृत्त कोषाधिकारी आय, जे,शिंपी व से,नि, कृषी सहायक सुभाष चाफेकर यांनी प्रथम साने गुरुजी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले, ग्रंथपाल सहायक एस, व्ही, राजपूत यांच्या उपस्थितीत जेष्ठ वाचक तथा माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यांनी साने गुरुजींच्या कार्याबद्धल थोडक्यात माहिती दिली, या प्रसंगी वाचक वर्गानी श्यामची आई या पुस्तकासह ईतर पुस्तके हातात घेऊन साने गुरुजींच्या स्मृतींना अभिवादन केले ,याप्रसंगी वाल्मिक शेटे,गणेश टिभे, सुमित चिंधाळे,शेख वसीम,युनूस फारूक देशमुख,बबन क्षीरसागर,भाऊसाहेब कोराळे, नितीन शिंदे,केशव क्षीरसागर व इतर वाचक वर्ग उपस्थित होता, शेवटी संजय राजपूत यांनी आभार मानले.





# श्रीक्षेत्र टिटवी ते पंढरपूर पायी दिंडी सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** श्री क्षेत्र टिटवी येथील दरवर्षीप्रमाणे याही वर्षी टिटवी ते श्री क्षेत्र पंढरपुर येथे आषाढी एकादशीनिमित्त पायी वारीचे दिंडी १४६वे वर्षे चालक श्री ह.भ.प. कैलास महाराज राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली टिटवी परिसरातील विशाल राऊत, जनार्दन पुनवे, शालिकराम टेकाळे , कान्हुमामा माघाडे टिटवी, नामदेव घाटे, सोपान कोकाटे, भिकाजी कोकाटे, विठ्ठल गायकवाड, किसन तनपुरे, श्रीहरि तनपुरे, संभाजी मोरे, महादेव मोरे, डॉक्टर हरिभाऊ मोरे, भगवान मुंढे, दिनकर वाघ, राम बन, सदाशिव वाघ, जनार्दन स्वामी, वामन शेळके तळणी, पांडुरंग हाके, पुरुषोत्तम महाराज राऊत, मुरलीधर राऊत,यामध्ये विणेकरी विठ्ठल महाराज देशमुख देशमुख, टिटवी येथील चोपदार लक्ष्मण मोरे,नाना मोरे,सखाराम मोरे, पांडुरंग मुंढे, रतन इंगळे,आसाराम मोरे, नाना देशमुख, सखाराम देशमुख, दत्तराव देशमुख, बाबासाहेब देशमुख यासह टिटवी येथील व परिसरातील टिटवि नांद्रा देवठाणा, सावरगाव, कान्हडी, उसवद , खुरमपुर, वडगाव, आसोला, सवडद ,धानोरा, सालेगाव, माळतोंडी, चिंचोली, पार्डा, परभणी, लोणी, कंधारी यासह आजूबाजूच्या परिसरातील शकडो भाविक भक्त, हरी भक्तांनी या पायी पालखी सोहळ्यात सहभाग नोंदवला आहे. या पायी दिंडीचे स्वागत चारठाणा येथील लक्ष्मण राऊत, गणपत राऊत यांच्या शेतात अल्पहार व चहा, पाणी ची व्यवस्था,व येथील पेठ विभागातील मेन रोड वरील गणेश क्षिरसागर याच्या घरी भोजनाची सोय करण्यात आली, या दिंडीचे चालक कैलास महाराज राऊत याचे व विणेकरीचे व दिंडीतील सर्वाचे स्वागत करून विठ्ठलाची आरती करण्यात आली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समस्त राऊत व क्षीरसागर परिवार व येथील भाविक भक्त व मीज मंडळानी परिश्रम घेतले आहेत.

# महाराष्ट्र बँकेमध्ये नागरिकांची गैरसोय

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** ( ताः खुलताबाद ) येथे ग्रामीण व डोंगराळ भागातील 30 गावांसाठी एकमेव राष्ट्रीय कृत बँक म्हणून बँक ऑफ महाराष्ट्राची शाखा 42 वर्षापासून कार्यरत आहे ग्राहकांची संख्या अधिक असल्याने शुक्रवार सोमवारी अधिकाधिक खातेदार व्यवहारासाठी येत असतात मात्र कार्यालयीन इमारतीत एकच काउंटर मुख्य व्यवस्थापक सहाय्यक व्यवस्थापक लिपिक व ग्राहकांच्या लिखाणासाठी टेबल व व्यक्ती त्यात एकमेव दरवाजा यामुळे ग्राहकांना गर्दीच्या दिवशी वाट पाहत उभे राहावे लागते दरवाजा लगतच रहदारीचा रस्ता व आत काउंटर असल्याने बाहेर थांबणे जिकरीचे ठरते. महिला व पुरुष खातेदारांसाठी एकच एक रांग करावी लागते काउंटर सोयी सुविधांचा टेबल यामुळे जास्त खातेदारांची रांग लावणे अवघड असते कोरोना काळापासून काउंटर समोरच बेंच उभारल्याने बैठकीसाठी सुविधा नाही बँक व्यवहार साठी शेतकरी पिक कर्जदार विद्यार्थी पुरुष महिला बचत गट खातेदार शासकीय निमशासकीय कर्मचारी निवृत्तीवेतनधारक व ज्येष्ठ खातेदारांची नेहमी कामासाठी गर्दी होत असल्याने विभागीय बँक व्यवस्थापनाने यासंबंधी शुक्रवार आठवडी बाजार व सोमवार या दिवशी भेट देऊन दुहेरी काउंटर व्यवस्था करून सुविधा पुरवता येईल का यासंबंधी अवश्य विचार करावा किंवा विस्तारित इमारतीचा विचार व्हावा अशी खातेदारांची मागणी आहे.

# महाराष्ट्र ग्रामीण बँकेत धाडसी चोरी

आधुनिक केसरी न्यूज



**बीड :** मौजे लिंबागणेश येथील अहमदपूर-अहमदनगर राष्ट्रीय महामार्गावरील मांजरसुंभा ते पाटोदा दरम्यान लिंबागणेश स्थित महाराष्ट्र ग्रामीण बँकेत धाडसी चोरी झाल्याचा प्रकार आढळून आला. सहाय्यक पोलिस अधीक्षक पंकज कुमावत तसेच नेकनूर पोलिस स्टेशनचे सपोनि शेख मुस्तफा, उपनिरीक्षक विलास जाधव, उपनिरीक्षक अजय पानपाटील,चालक शेख लिंबागणेश पोलिस स्टेशनचे पो.ह.सचिन डिडुळ,नवनाथ मुंडे घटनास्थळी दाखल झाले असुन स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा,ठसेतज्ञ, श्वानपथक टीम दाखल झाली असुन स्थळपंचनामा करण्यात आला असून तपास चालू आहे. मध्यरात्री लिंबागणेश येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या पाठीमागील बाजुने लोखंडी शिडीवरून चढून गॅस कटरच्या सहाय्याने लोखंडी खिडकीचे गज तोंडुन चोरट्यांनी आत प्रवेश केला . बँक मनेजर प्रणव कापसे यांच्या म्हणण्यानुसार अंदाजे साडे बारा लाख रोख रक्कम व काही सोने चोरीला गेले असल्याचे समजते.

# धर्माबाद येथे आरोग्य अधिकारीपदी डॉ. बोर्डे नियुक्त

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** तालुका आरोग्य अधिकारी हे पद



एक वर्षांपासून रिक्त असल्याकारणाने तालुक्याची आरोग्य व्यवस्था 'अस्वस्थ' असून त्यांची प्रकृती सुधारण्यासाठी महाराष्ट्र शासनाद्वारे धर्माबाद तालुका आरोग्य अधिकारी म्हूणन डॉ.बोर्डे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

धर्माबाद तालुक्यात ५२ गावे असून तालुक्याची लोकसंख्या ७० हजाराच्या वर आहे.अर्थात ग्रामीण व शहरी भागातील शेतकरी, कष्टकरी व गोरगरीब जनतेला शासकीय रुग्णालयाचा मोठा आधार असतो.त्याना छोटे - मोठे आजार झाल्यास खिशात पैसा असो अथवा नसो शासकीय रुग्णालय हक्काचे ठिकाण असते. धर्माबाद तालुक्यात करखेली व सिरसखोड येथे दोन प्राथमिक आरोग्य केंद्र असून चिकना, करखेली, जारीकोट, चोळखा, कारेगाव फाटा,सिरसखोड, बेल्लूर, येताळ, मंगनाळी येथे असे नऊ आरोग्य उपकेंद्र कार्यरत आहेत. याशिवाय जारीकोट येथे एक नागरिक दवाखाना तर धर्माबाद शहरात एक आपला दवाखाना, एक 'आरोग्य वर्धनी केंद्र आणि शासकीय रुग्णालय आहे. डॉ. अशोक खंदारे एक वर्षांपूर्वी हे सेवानिवृत्त झाले असून तेंव्हापासून हे पद रिक्त आहे. तात्पुरत्या स्वरूपात हा कारभार बिलोलीचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. देवराये यांच्याकडे वर्ग करण्यात आला होता.मात्र दोन ठिकाणच्या कार्यभारामुळे त्यांना मर्यादा होत्या. परिणामी अधिकारी व कर्मचाऱ्यावर वचक नसल्याने सत्तर हजार लोकसंख्या असलेल्या तालुक्याची आरोग्य व्यवस्था खिळखिळी झाली होती. धर्माबाद ग्रामीण रुग्णालय असो किंवा प्राथमिक आरोग्य केंद्र याठिकाणी प्रसूतीच्या पेशंट मोठ्या प्रमाणात येतात मात्र रितिरिवाजप्रमाणे येथील पेशंट एक तर नांदेड, निझामबाद किंवा भैसां येथे जाण्याची शिफारस करून डॉक्टर मोकळे होत असतात.ग्रामीण रुग्णालयात नॉर्मल डिलेव्हरीचे प्रमाण नगण्य आहे.सीझरसाठी लागणाऱ्या सुविधा येथे उपलब्ध नाहीत.

प्रसूती झालेल्या मातांसाठी अनेक सोयी सुविधा आहेत. मात्र ह्या व्यवहारात कमी कागदोपत्री जास्त ॲक्टिव्ह आहेत. धर्माबाद तालुक्याचे नूतन तालुका आरोग्य अधिकारी डॉ. लालू बोर्डे यांच्या गाठीशी शिर्डी व मोघाळी ( ता. भोकर ) येथील कार्याचा अनुभव असून ते गोरगरीब जनतेच्या सेवेसाठी तत्पर असतात अशी त्यांची ख्याती आहे. डॉ.बोर्डे यांच्यासोर सुस्त व अस्वस्थ झालेल्या आरोग्य व्यवस्थेला आणि स्वस्थ करण्याचे आव्हान आहे. एकदा का आरोग्य व्यवस्था शिस्त व स्वस्थ झाली की, जनतेचे आरोग्य ही स्वस्थ ठेवण्यास सोपे जाईल.डॉ. बोर्डे हे पुढील आठवड्यात आपला पदभार स्वीकारतील अशी माहिती मिळाली आहे.

# भारतासारख्या बहुसंख्य हिंदू देशात हिंदू खतरे मे असं बिगर हिंदूंना का वाटते ?

## प्रा. सुभाष वायदंडे यांचा सवाल

आधुनिक केसरी न्यूज

**जत/सांगली :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदुस्तानात हिंदूंची संख्या जास्त असताना हिंदू असुरक्षित असल्याची भावना बिगरहिंदू हिंदूंना का करून देत आहेत ?असा सवाल करून याच्या पाठीमागचं मनुवाद्यांचं कुटीलकारस्थान ओळखुन हिंदूंनी दंगली पासून सावध राहण्याचं आवाहन पुरोगामी संघर्ष परिषदेचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष संघर्ष नायक प्रा. सुभाष वायदंडे यांनी केले.ते सोन्याळ ( तालुका जत )येथे पुरोगामी संघर्ष परिषदेच्या सोन्याळ शाखा उद्घाटन प्रसंगी बोलत होते. पुढे बोलताना प्राध्यापक वायदंडे म्हणाले मागासवर्गी यांच्यावर अन्याय करत असताना अन्यायाची ठिकाणं बदलली असून आरक्षण आणि शैक्षणिक क्षेत्राच्या माध्यमातून मागासवर्गी यांच्यावर अन्याय करण्याचे षडयंत्र चालू असून हिंदूंची डोकी भडकावून दंगली घडवण्याचा प्रयत्न चालू आहे यात जास्त नुकसान हे मागासने यांचंच असल्यामुळेयात जास्त नुकसान हे मागासवण्याचाच असल्यामुळे मनूवादी वृत्तीने वेळीच ओळखण्याचे आव्हानही केले. राज्य प्रवक्ता पांडुरंग रणदिवे आपल्या भाषणात म्हणाले की,देशात दरडोई उत्पन्नाचा आकडा घसरत असताना देशाचा विकास करण्याच्या वल्गना म्हणजे निव्वळ भुलथाप आहेत. यावेळी पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष म्हणून अशोक हातीकर, ग्रामीण जिल्हाध्यक्ष विठ्ठल नाटेकर, जत वरिष्ठ तालुकाध्यक्ष संजय केंगार, माढा तालुकाध्यक्ष संभाजी भडकवाड यांच्या निवडी करून त्यांचा सत्कार प्रा. सुभाष वायदंडे यांच्या हस्ते करण्यात आला. सदर कार्यक्रमास राज्य उपाध्यक्षा सौ.सुनिता खटावकर ,राज्य संघटक अमोल महापुरे, प्रदेश कार्याध्यक्ष दीपक सकटे, पश्चिम महाराष्ट्र संपर्कप्रमुख कृष्णाजी गायकवाड, वरिष्ठ सांगली जिल्हाध्यक्ष मल्हारी चव्हाण, जिल्हाध्यक्षा वनिता सोनवले, शिला बनसोडे इत्यादी पुरोगामी संघर्ष परिषदेचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. पुरोगामी संघर्ष परिषद शाखा सोन्याळ ( ता. जत )उद्घाटन प्रसंगी बोलताना राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष प्रा. सुभाष वायदंडे बाजुस राज्य प्रवक्ता पांडुरंग रणदिवे, राज्य उपाध्यक्षा सौ. सुनीता खटावकर व इतर.





# शांतीब्रह्म एकनाथ महाराजांच्या पालखीचे भव्य स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**जयप्रकाश बागडे**

**शेवगाव :** श्रीक्षेत्र पैठणचे शांती ब्रह्म एकनाथ महाराजांची पालखी सोहळा हा पंढरीच्या दिशेने विठुरायाचा व ज्ञानोबा तुकारामाचा गजर करीत मार्गक्रमण असून बालमटाकळी येथे पालखीला पायघड्या टाकून ढोल ताशांच्या व टाळ मृदंगाच्या गजरात सबंध गावातून पालखी मिरवणूक भाविकांनी नाथांच्या पादुकांचे मोठ्या भक्ती भावाने दर्शन घेऊन नाथ पालखीचे चालक गोसावी महाराजांचे स्वागत केले. आकाशाला गवसणी घालणाऱ्या उंच उंच पताका, वारकऱ्यांच्या हातातील भगवे झेंडे, टाळ मृदुंगाचा निनाद आणि ज्ञानोबा तुकाराम व भानुदास एकनाथ महाराजांचा गजर करीत वैष्णवांचा मेळा हा आषाढी एकादशी निमित्त पंढरीच्या विठुरायाला भेटण्यासाठी दरकोस दर मुक्काम करीत पंढरपूरला दिशेने निघालेला आहे. श्री क्षेत्र पैठणचे शांती ब्रह्म एकनाथ महाराजांची पालखी सोहळा हा शेवगाव तालुक्याच्या मुंगी, हातगाव ,बोधेगाव, बालमटाकळी बाडगव्हाण , लाड जळगाव, शेकटे खुर्द मार्गे कुंडलपारगाव जिल्हा बीड अशा मार्गाने मार्गक्रमण केले आहे. श्री क्षेत्र पैठण ते श्रीक्षेत्र पंढरपूर हा पालखी मार्ग अनेक वर्षापासून धीम्या गतीने होत असलेल्या कामामुळे रखडलेला आहे त्यामुळे वारकऱ्यांना पंढरीला जाण्यासाठी अनेक खस्ता खावा लागत आहे. त्यातच शांती ब्रह्म एकनाथ महाराज पालखीचे चालक व नाथांचे वंशज रघुनाथ बुवा गोसावी यांनी नवीन पायंडा पाडला होता की पालखी ही फक्त पैठण ते पंढरपूर पालखी मार्गानेच जाणार, शेकडो वर्षापूर्वी पासूनची परंपरा असून देखील पालखी पालखी मार्गाने जाणार असा निर्णय घेतल्याने भाविक संतप्त झाल्याने भाविकांना तहसीलदार व पोलीस स्टेशनचा आश्रय घेऊन पालखी आपल्या गावात दर्शनासाठी कशी येईल यासाठी प्रयत्न केले होते, बालमटाकळीत शेकडो वर्षापासून नाथांची पालखी येत असताना देखील पालखी चालकांनी येण्यास टाळले होते परंतु पालखी हातगाव मुक्कामास असताना गावातील प्रतिष्ठित व्यक्ती व भाविकांसह शेवगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांच्या मध्यस्थीने बालमटाकळीत पालखी येणार असल्याचे पालखी चालक गोसावी यांनी कबूल केले. अन्यथा बोधगाव येथील लाडजळगाव फाट्यावर हजारो संतप्त भाविक पालखी अडवणार असल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ, नये म्हणून शेवगाव पोलिसांनी मध्यस्थी केल्याने हा अनर्थ टळला.

श्री क्षेत्र पैठण ते श्री क्षेत्र पंढरपूर हा 752 पालखी मार्ग असून रस्त्याची कामे गेल्या चार ते पाच वर्षापासून अत्यंत धीम्या गतीने चालू आहे , नाथ महाराजांची पालखी ही पालखी मार्गावरून बोधेगाव मार्गे बालमटाकळी व बाडगव्हाण मार्गे लाडजळगाव पुन्हा पालखी मार्गावरून जात असते परंतु बालमटाकळी ते बाडगव्हाण हा देखील पालखीचा मार्ग असल्याने आणि या रस्त्यावर 752 क्रमांकाचा बोर्ड देखील लावलेला असून या पालखी मार्गाचे काम देखील लवकरात लवकर सुरू करण्याची मागणी भाविकांनी केली आहे .



# पाचोरा तालुक्यातील कोल्हे येथील पीडिता आठ महिन्यांपासून न्यायापासून वंचित

आधुनिक केसरी न्यूज

**पाचोरा :** तालुक्यातील कोल्हे येथील सोळा वर्षीय अल्पवयीन मुलीवरील झालेल्या अन्यायाविरुद्ध मागील काही महिन्यापासुन पिंपळगाव हरेश्वर पोलीस कार्यालयाला तक्रार करून देखील आजपर्यंत न्यायापासून सदर पीडित मुलीला वंचित राहावे लागले असल्याची तक्रार सदर पिडीत मुलीने जिल्हा पोलीस अधिक्षक जळगाव यांच्याकडे लेखी तक्रार केली आहे. सदर मुलीने तक्रार अर्जात असे म्हटले की, सासरकडील व सावत्र आई- विरुद्ध पिंपळगाव हरेश्वर पोलीस स्टेशन येथे तक्रार देऊन न्यायाची मागणी केली होती. परंतु सदर पीडित अन्यायग्रस्त अल्पवयीन मुलगी वय.16.वर्षे हिच्या तक्रारीकडे पोलिसांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून अन्याय करणाऱ्या लोकांनाच पाठीशी घालून प्रकरण दडपल्याने सदर मुलीने जिल्हा पोलीस अधीक्षक जळगाव यांच्याकडे दिनांकः ०८/06 /2023 रोजी एका लेखी दिलेल्या तक्रार अर्जात केली असल्याची माहिती मिळालेली आहे.

सदर पीडित मुलीने जिल्हा पोलीस अधिक्षक जळगाव यांना दिलेल्या तक्रार अर्जात असे म्हटले आहे की, मी लहान असतानाच माझी जन्मदेती आई मरण पावली व आम्हाला आईचे प्रेम मिळावे म्हणून माझ्या सख्या मावशी सोबत वडिलांनी लग्न केले, मात्र सावत्र आई सारखेच तीने नेहमी मला त्रास दिला व वडिलांना सांगून माझी इ.8.वी पासून शाळा बंद केली, मला नेहमी शेती कामाला पाठवून मिळणारे पैसे स्वतः जवळ ठेवले, व मिळणाऱ्या पैशातुन समाधान झाले नाही म्हणून माझ्या वडिलांच्या मागे लागून माझे लग्न मी 14 वर्षाची असतानाच भडगाव येथील एका तरुणाशी करून दिले, व आर्थिक देवाण-घेवाण करून माझी पूर्ण जबाबदारी झटकून मोकळे झाले. सासरकडील लोकांनी माझा मोठ्या प्रमाणात छळ केला. त्यांच्याकडून माझी सुटका करणारे माझी आई बापानेच माझ्याकडे पाठ फिरवल्याने लहान असताना आईचे प्रेम देणारी माझी आजी मला वाचवू शकते म्हणून आजीला बोलावून घेतले. आजीने भडगाव येथून माझी कशी तरी सुटका करून मुंबई येथे आत्याकडे मला घेऊन गेली. मात्र माझ्या सावत्र आईला माहिती मिळताच तीने मला फोन द्वारे धमकवायला सुरुवात केले व तुला भडगावलाच राहावं लागेल असा माझ्यावर दबाव बनवू लागली, मी या सर्व प्रकारामुळे अधिक भयभीत झाल्याचे आजी व आत्याच्या लक्षात येताच त्यांनी मला घेऊन पिंपळगाव हरे पोलीस ठाणे गाठले मात्र पिंपळगाव हरेश्वर पोलीसांनी तक्रार घेण्यास टाळाटाळ केली. मात्र आजी व आत्याने तक्रार देण्यास ठाम भूमिका घेतल्याने त्यांना तक्रार घ्यावी लागली व त्या तक्रारी वरून पिंपळगाव हरे पोलीस विभागाने मला बाल कल्याण समिती जळगांव येथे पाठवले, व एक ते दीड महिन्यानंतर समितीने मला मुंबई येथे आत्या कडे पाठवले मात्र आज आठ महिने निघून गेलेत तरी देखील मला न्याय मिळाला नाही म्हणून आजीने गावाकडे जाण्याचा निर्णय घेतला मात्र गावाकडे स्वतःच्या घरात जाण्यापासून माझ्या सावत्र आईने माझ्या आजीला वंचित ठेवले व तुझ्या नातीचा तुझ्या मुलीचा पाय आम्हाला गावात नको व तूच तिला भडगाव येथून घेऊन गेलीस तुला मी घरात येऊ देणार नाही असे सांगून हाकलून दिले.हा सर्व प्रकार बघून आजीने पिंपळगाव हरे पोलीस ठाणे गाठले व माझ्या नातीच्या केसचे काय झाले अशी विचारना केली असता पोलीसानी समज देत हा विषय आता काढू नका. तेव्हा सहाय्यक पोलीस निरीक्षक यांनी माझ्या सावत्र आईला ठाण्यात बोलवून घेतले व मुलीच्या सासरकडील लोकांनी किती सोने दिले ते तुमच्या सुनेला द्या तरच सुन घरात घेण्याचे म्हणते या स्वरूपाचे विषय आजी समोर काढून आजीचे मानसिक खच्चीकरण करून आपण या पुढे पोलीस ठाण्यात येऊ नये, अशी समज देऊन आजीला जाण्यास सांगितले.तक्रारीत पीडिता असेही म्हणते की माझ्या सावत्र आईला बळ देणारे पिंपळगाव हरे पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हेच आहेत. त्यामुळे माझे त्यांना पाठीशी घालून वाचवणारे सहाय्यक पोलीस निरीक्षक, दोषी आहेत. न्याय मिळावा अशी पीडित मुलीने पोलीस अधीक्षक जळगाव,जिल्हा अधिकारी जळगाव, महिला आयोग, मानवाधिकार आयोग यांना दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे.

# ट्रकची बसला धडक, सात प्रवासी जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** नागपूर-तुळजापूर राष्ट्रीय मार्गावर यवतमाळनजीक भोसाजवळ घाटंजी वळण रस्त्यावर राज्य परिवहन महामंडळाच्या बसला ट्रकने जबर धडक दिली. या अपघातात बसमधील सात प्रवासी जखमी झाले. हा अपघात सकाळी १० वाजता झाला. बस क्र. (एमएच ४०/वाय ५६१४) ही यवतमाळहून घाटंजी मार्गे किनवटला जात होती. भोसा चौफुलीवर ही बस वळण घेत असताना नागपूरकडे जाणाऱ्या ट्रक क्र. (एमएच४०/ वाय ८२७४) ने बसला मध्यभागी जोरदार धडक दिली. सुदैवाने बस पलटी न झाल्याने मोठा अनर्थ टळला. अपघातात बसमधील चालकाच्या बाजूने असलेल्या रांगेतील सात प्रवासी जखमी झाले. अपघात होताच नागरिकांनी मदतीसाठी धाव घेतली. अपघाताने एका बाजूची वाहतूक खोळंबली होती.



हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन, ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)

डॉ. शेख ए.एच.
या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार

किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर